
आषाढी एकादशीच्या शुभेच्छा

# दैनिक जनता आवाज




अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १३२ रविवार, दि. ०६ जुलै २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

## संमिश्र

### तेलंगणा स्फोटातील मृतांची संख्या ४० वर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**हैदराबाद** : तेलंगणा फार्मा कारखान्यातील स्फोटातील मृतांची संख्या शनिवारी ३९ वरून ४० वर पोहोचली. जिल्ह्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी चंद्रशेखर बडुगु यांनी सांगितले की, आज सकाळी आणखी एका जखमी कामगाराचा मृत्यू झाला. आता १९ जखमींवर उपचार सुरू आहेत, तर नऊ जणांचा शोध सुरू आहे. ३० जून रोजी सकाळी ८.१५ ते ९.३० च्या दरम्यान पसुमिल्लाराम औद्योगिक क्षेत्रातील सिगाची इंडस्ट्रीजमध्ये हा अपघात झाला. घटनेच्या वेळी कारखान्यात १५० लोक होते, ज्यात स्फोटाच्या ठिकाणी ९० लोक होते. बचाव आणि वैद्यकीय पथकांनी त्या दिवशी ३१ मृतदेह बाहेर काढले.

### लालू यादव १३ व्यांदा राजदचे राष्ट्रीय अध्यक्ष

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पटना** : लालू यादव १३ व्यांदा राजदचे राष्ट्रीय अध्यक्ष बनले आहेत. शनिवारी पाटणा येथील बाबू सभागृहात झालेल्या राजदच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत ही घोषणा करण्यात आली. ते २०२८ पर्यंत राजदचे राष्ट्रीय अध्यक्ष राहतील. राष्ट्रीय अध्यक्ष झाल्यानंतर लालू यादव आणि राबडी यांनी कार्यकर्त्यांचे आणि पक्षाच्या नेत्यांचे हात हलवून स्वागत केले. अधिवेशनाचे अध्यक्षपद पक्षाचे राष्ट्रीय निवडणूक अधिकारी डॉ. रामचंद्र पूर्वे यांनी भूषवले. लालू यादव यांनी २३ जून रोजी पाटणा येथील पक्ष कार्यालयात अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला. त्यांच्याविरुद्ध इतर कोणत्याही नेत्याने अर्ज दाखल केला नाही.

### तीन वर्षांपूर्वी आडवे झाले, ते सावरलेच नाहीत: उद्धव ठाकरे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : तीन वर्षांपूर्वी धो डाला, अब उठेगा नहीं साला, हा डायलॉग उद्धव ठाकरेंना शोभून दिसतो. तीन वर्षांपूर्वी दाढीवरून अर्धाच हात फिरवल्याने ते आडवे झाले, अजून सावरले नाहीत. आता कुणाचा तरी हात पकडून उठण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे उठेगा नहीं असे डायलॉग बोलणे त्यांना शोभत नाही. अशी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. फक्त तोंडाच्या वाफा सोडून होत नाही, त्यासाठी मनगटात जोर लागतो, असेही शिंदे म्हणाले. एकाने मराठीबद्दल असलेली तळमळ बोलून दाखवली. दुसऱ्याने सत्तेसाठी आणि खुर्चीसाठी असलेली मळमळ बोलून दाखवली. झेंडा नाही, अजेंडा नाही असे काही लोक म्हणत होते.




# ... हा मराठीचा विजयोत्सव नव्हे, तर रुदाली

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ठाकरेंवर पलटवार; रुदालीचे भाषण म्हणत विजयी मेळाव्यावर टीका

जनता आवाज वृत्तसेवा

**पंढरपूर : राज व उद्धव ठाकरे एकत्र आल्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांचे आशीर्वादच मलाच मिळतील, अशा उपरोधिक सूरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज व उद्धव ठाकरे यांच्या मनोमिलनावर भाष्य केले आहे. मी राज ठाकरे यांचे आभार मानतो. त्यांनी दोन बंधू एकत्र आणण्याचे श्रेय मला दिले. श्रद्धेय बाळासाहेबांचे आशीर्वाद हे मलाच मिळत असतील. पण मला असे सांगण्यात आले होते की, तिकडे विजयी मेळावा होणार आहे. पण त्या ठिकाणी केवळ रुदालीचे भाषण झाले, असे ते म्हणाले.**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या पंढरपूरच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी तेथील नियोजनाचा आढावा घेत प्रशासनाने केलेल्या तयारीचे तोंड भरून कौतुक केले. आपल्या प्रशासनाने येथे अतिशय उत्तम व्यवस्था केली आहे. आता उद्याचा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे. निश्चितपणे यावेळी जशी उत्तम व्यवस्था झाली. आषाढीचे पर्व संपल्यानंतर काही उणिवा राहिल्या काय? हे पुन्हा पाहिले जाईल. पुढच्या वर्षी याहून चांगली व्यवस्था करू, असे ते म्हणाले.

यावेळी पत्रकारांनी त्यांचे राज व उद्धव ठाकरे यांच्या मनोमिलनाकडे लक्ष वेधले. त्यावर फडणवीस उपरोधिकपणे म्हणाले, मी राज ठाकरे यांचे आभार मानतो. त्यांनी दोन बंधू एकत्र आणण्याचे श्रेय मला दिले. श्रद्धेय बाळासाहेबांचे आशीर्वाद हे मलाच मिळत असतील. पण मला असे सांगण्यात आले होते की, तिकडे विजयी मेळावा होणार आहे. पण त्या ठिकाणी रुदालीचे भाषण झाले. मराठीवर एक शब्दही न बोलता, आमचे सरकार गेले, आमचे सरकार पाडले, आम्हाला सरकारमध्ये न्या, आम्हालाच निवडून द्या असे म्हटले गेले. हा मराठीचा विजयोत्सव नव्हता, ही रुदाली होती. या रुदालीचे दर्शन आपल्याला त्या ठिकाणी झाले.



मुळात मुंबई महापालिका २५ वर्षे त्यांच्या ताब्यात होती. त्यानंतरही त्यांना दाखवण्यासारखे एकही काम करता आले नाही. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आम्ही मुंबईचा चेहरा बदलला. त्यांच्या काळात मराठी माणूस मुंबईतून हद्दपार झाला. उलटपक्षी आम्ही बीडीडी चाळीतील मराठी माणसांना, पत्राचाळीतील मराठी माणसांना, अभ्युदय नगर येथील मराठी माणसांना त्याच ठिकाणी हक्काचे मोठे घर दिले. याची असुया त्यांच्या मनामध्ये आहे. तत्पूर्वी, राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात उपरोधिकपणे दोन्ही भावांना एकत्र आणण्याचे श्रेय देवेंद्र फडणवीस यांना दिले होते. मी मागे माझ्या मुलाखतीत म्हटले होते की, कोणत्याही वादापेक्षा, भांडणापेक्षा माझ्यासाठी महाराष्ट्र व मराठी माणूस मोठा आहे. त्या वक्तव्यापासून राज्यात वेगवेगळ्या चर्चा सुरू झाल्या आहेत. पण एक गोष्ट खरी, जे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना जमले नाही, राज्यातील कुठल्याही नेत्याला किंवा व्यक्तीला जमले नाही ते देवेंद्र फडणवीस यांना जमले. आम्हा दोघांना एकत्र आणणे फडणवीसांना जमले, असे ते म्हणाले होते.

### आमच्यासोबत मराठी, अमराठी सर्वच : फडणवीस

ये पब्लिक है सब जानती है. त्यामुळे मुंबईतील मराठी असो की अमराठी माणूस असो, सर्वच आमच्यासोबत आहेत. आम्ही मराठी आहोत. आम्हाला मराठी असल्याचा अभिमान आहे. मराठी भाषेचा अभिमान आहे. पण त्याचवेळी आम्ही हिंदू आहोत. आम्हाला हिंदुत्वाचा अभिमान आहे. आमचे हिंदुत्व हे सर्वांना सोबत घेऊन चालणारे आहे, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# ... अखेर २० वर्षांनंतर 'राज-उद्धव' एकत्र

## राज्याच्या राजकारणात ठाकरे बंधूंचा नवा अध्याय सुरू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : अखेर महाराष्ट्राला ज्या ऐतिहासिक क्षणाची प्रतीक्षा होती, तो क्षण काल वरळीतील डोममध्ये पाहायला मिळाला. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोन राजकीयदृष्ट्या वेगळे झालेल्या ठाकरे बंधूंनी जवळपास १९ वर्षांनंतर एकत्र एका मंचावर येत राज्याच्या राजकारणात नवा अध्याय सुरू केला आहे.

राज्यातील त्रिभाषा सक्तीचा शासन निर्णय रद्द झाल्यानंतर या विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी मराठी विजय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्याच्या निमित्ताने दोन्ही नेते एकत्र आल्याने, उपस्थित हजारो नागरिकांच्या साक्षीने मराठी अस्मितेचा आणि एकजुटीचा महत्त्वपूर्ण क्षण साकारला.

यावेळी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंची वरळी डोममध्ये थाटात एन्ट्री झाली. तसेच एन्ट्रीला आपले ठाकरे गाणं वाजलं आणि त्यानंतर वरळी डोममधल्या मंचावर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी एकाचवेळी एन्ट्री घेतली. यावेळी दोन्ही



भावांनी एकमेकांना मिठी मारली आणि मंचावरुन अवघ्या महाराष्ट्राला अभिवादन केले.

राज ठाकरे म्हणाले की, खरंतर मोर्चा निघायला पाहिजे होता. पण नुसतं मोर्चाच्या चर्चेनंतर माघार घ्यावी लागली. आजचा हा मेळावा शिवतीर्थावर मैदानात व्हायला हवा होता. मैदान ओसंडून वाहिलं असतं. मी बाहेर उभं असलेल्यांची दिलगिरी व्यक्त करतो. तसेच मला आणि उद्धव ठाकरेंना एकत्र आण्याण्यासाठी जे बाळासाहेबांना जमलं नाही ते देवेंद्र फडणवीसांना जमलं, असे म्हणत पान ४

# ...प्रवरा शैक्षणिक संकुलात रंगलेला विठ्ठनामाचा सोहळा



# गोदावरी कालव्यांना ओव्हर फ्लोचे पाणी द्या

## आ. आशुतोष काळेंची जलसंपदामंत्री विखेंकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : चालूवर्षी मे महिन्यात पावसाने सर्वत्र जोरदार हजेरी लावल्यामुळे व हवामान विभागाने देखील भरपूर पर्जन्यमान होणार असल्याचा अंदाज दिल्यामुळे कोपरगाव मतदारसंघातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात खरीप पिकांच्या पेरण्या केल्या आहेत. परंतु, जून महिन्यात अपेक्षित पर्जन्यमान झाले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंता वाढल्या असून गोदावरी कालव्यांना तातडीने ओव्हर फ्लोचे पाणी सोडावे, अशी मागणी आ. आशुतोष काळे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.

साधारणत: जून



महिन्यापासून सुरु होणाऱ्या पावसाचे मे महिन्यातच मोठ्या थाटात आगमन झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित होऊन पुढील पावसाच्या भरवशावर कोपरगाव मतदार संघात सोयाबीन, बाजरी, मका, कापूस, भुईमुग आदी खरीप पिकांची पेरणी शेतकऱ्यांनी केली आहे.

परंतु जून महिना संपून जुलै महिन्याचा पहिला आठवडा संपत आला, तरी कोपरगाव मतदारसंघात खरीप पिकांसाठी आवश्यक असलेले पर्जन्यमान झालेले नाही व त्यामुळे भूजलपातळी देखील वाढलेली नाही. पुढील काळात जर पावसाने अशीच उघडीप दिली तर खरीप पिकांना व बारमाही पिकांना त्याचा फटका बसून शेतकऱ्यांचे नुकसान होवू शकते व पिण्याच्या पाण्याचा देखील प्रश्न निर्माण होवू शकतो. एकीकडे कोपरगाव मतदारसंघात जरी पावसाने उघडीप दिली असली तरी मे व जून महिन्यात धरण क्षेत्रात मात्र पान ४

गोदावरी कालव्यांना ओव्हर फ्लोचे पाणी सोडल्यास भूजलपातळी वाढण्यास मदत होवून शेतकऱ्यांच्या विहिरींना पाणी उपलब्ध होईल व अडचणीच्या काळात हेच पाणी खरीप पिकांना देवून शेतकऱ्यांना आपले खरीप पिक वाचविता येईल. त्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करून तातडीने गोदावरी कालव्यांना ओव्हर फ्लोचे पाणी सोडावे, अशी मागणी जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्याकडे केली आहे.

**– आशुतोष काळे, आमदर**

# श्रीगोंद्यात साडेपाच लाखांचा पकडला गुटखा

## विशेष पोलीस पथकाची कारवाई; तीन आरोपी जेरबंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या विशेष पथकाने श्रीगोंदा पोलीस स्टेशन हद्दीअंतर्गत इनामदार वस्ती येथे गुटखा आणि गुटखा वाहतुकीवर कारवाई करत पाच लाख पंचावन्न हजार सहाशे रुपये किंमतीच्या आरएमडी, विमल गुटखा व सुगंधी पान मसाल्यासह गुटख्याची वाहतुक करणाऱ्यावर कारवाई करत तीन आरोपी जेरबंद केले आहे.

सदरील कारवाई काल दि. ५ जुलै रोजी



सकाळी ६ वाजेच्या दरम्यान करण्यात आली. यावेळी एक आरोपी फरार झाला असून यावेळी छोट्या चार चाकी टेम्पो व मुख्य आरोपी रवी बबन दळवी यांच्यासह तीन आरोपींना ताब्यात घेत टेम्पोसह अकरा लाख पाच हजार सहाशे रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

यावेळी पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, श्रीगोंदा तालुक्यात जर कुठेही अवैद्य वेश्या व्यवसाय, गुटखा विक्री, दारू, ताडीची विक्री, गांजाचा व्यापार, बिंगो सारखे अवैध प्रकार सुरू असल्याचे निदर्शनास आले, तर तत्काळ पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांना याबाबत माहिती द्यावी.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध धंदे व गुटखा विक्रीसारख्या अवैध धंद्यांवर पोलिसांकडून जिल्हाभर कडक कारवाई केली जात आहे. त्यामुळे अवैध धंद्यावर सातत्याने लक्ष ठेवले जात असून ही कारवाई त्याचाच एक भाग आहे.

– संतोष खाडे, पोलीस उपअधीक्षक

# विद्यार्थ्यांच्या हृदयस्पर्शी रिंगण सोहळ्याने संस्कृतीचे दर्शन

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पोलिस अधिक्षक घार्गेसह दिग्गज मान्यवरांची दिंडीत हजेरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : टाळ मृदुंगाचा गजर, विठू नामाचा जयघोष आणि भगवी पताका खांद्यावर घेवून सहकार आणि ज्ञानाच्या पंढरीत काल खऱ्या अर्थाने अवघा रंग एकची झाला हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग असलेली दिंडी आणि रिंगण सोहळ्याच हृदयस्पर्शी सोहळ्याने अध्यात्म आणि संस्कृतीचे शिस्तबध्द असे दर्शन घडविले.

आषाढी एकादशीनिमित्त प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या वतीने वारी पंढरीची, ज्ञानगंगा प्रवरेची ही संकल्पना घेवून दिंडी आणि रिंगण सोहळ्याचे आयोजन केले होते. संस्थेच्या मुख्य कार्यकारी आधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या पुढाकाराने गावागावातील विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांचा सहभाग असलेल्या दिंड्या काल सकाळीच सहकाराच्या भूमीत दाखल झाल्या. पान ४

### विद्यार्थ्यांना अध्यात्मिकाचे शिकवण दिल्याचे समाधान : विखे

वारी पंढरीची आणि ज्ञानगंगा प्रवरेची या सोहळ्यातून नव्या पिढीला आषाढी वारीसाठी पंढरपुरला जाणाऱ्या वारीचे महत्व समजावे, हा उद्देश होता. मागील पंधरा दिवसांपासून या अध्यात्मिक आणि सांस्कृतिक सोहळ्याची जय्यत तयारी करताना विद्यार्थ्यांना वारीमध्ये गायले जाणारे अभंग, टाळ आणि मृदुंगाच्या तालावर खेळले जाणारे खेळ, रिंगण सोहळा, पाऊली या सर्वांची शिकवणूक या निमित्ताने विद्यार्थ्यांना देता आल्याचे समाधान डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी व्यक्त केले.



वारी पंढरीची आणि ज्ञानगंगा प्रवरेची हा सोहळा म्हणजे साक्षात पंढरपुरमध्ये अवघा रंग एकची झाला, रंगी रंगला श्रीरंग असे वातावरण निर्माण करणारा आहे. या वारीमुळे सांस्कृतिक आणि सामाजिक एकतेचा संदेश सर्वांना मिळाला असून, वारी म्हणजे अध्यात्म आणि सनातन संस्कृतीचे दर्शन घडविणारा एक सांस्कृतिक उत्सव आहे. हा वारसा पुढच्या पिढीला समजावा म्हणून प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेने आयोजित केलेला हा हृदयस्पर्शी सोहळा संपूर्ण राज्याचे नव्हे तर देशाचे लक्ष वेधून घेणारा आहे.

**– डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री**

# आषाढी वारीच्या दिंडीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

## अमृतवाहिनी मॉडेल स्कूलच्या चिमुकल्यांची रिमझिम पावसात आषाढी दिंडी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** आषाढी वारी ही महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा असून अमृतवाहिनी मॉडेल स्कूलच्या ३०० विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, मुक्ताबाई अशा वेगवेगळ्या वेशभूषा करून रिमझिम पावसात विठ्ठल नामाचा गजर करत झाडे लावा झाडे जगवा हा पर्यावरणाचा संदेश देत आषाढी वारीचे दर्शन घडविले.

अमृतवाहिनी मॉडेल स्कूलच्या ३०० लहान विद्यार्थ्यांनी संगमनेर बस स्थानक, नवीन नगर रोड, जाणता राजा मैदान, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे निवासस्थान, ते यशोधन अशी वारी काढून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते कांचनताई थोरात यांनी या चिमुकल्या वारकऱ्यांचे स्वागत केले.

रिमझिम पाऊस, झाडे लावा, झाडे जगवा या घोषणा, जल है, तो कल है एक बच्चा ,एक झाड, या घोषणा देत या चिमुकल्यांनी संगमनेर दणाणून दिले. यावेळी महाराष्ट्राची उज्वल परंपरा सांगणाऱ्या विविध संतांची वेशभूषा करून हातात, डोक्यावर तुळशी वृंदावन, विना अशी वेगवेगळी वेशभूषा करून ही वारकरी दिंडी संगमनेर मध्ये सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.

कांचनताई थोरात म्हणाल्या की, पंढरपूरची वारी हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक एकतेचे प्रतीक आहे. आषाढी वारीमध्ये



महाराष्ट्रातील गोरगरीब, भोळाभाबडा, असे सर्व नागरिक व महिला सहभागी होतात. यामध्ये कधीही भेदभाव होत नाही.

डॉ. जयश्री थोरात म्हणाल्या की, अमृतवाहिनी मॉडेल स्कूलचा हा स्तुत्य उपक्रम असून दिंडीमधील विठ्ठल, रखुमाई, संत ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, मुक्ताबाई, तुकाराम, सोपान, चोखामेळा हे सामाजिक एकतेचा संदेश देतात. यशोधन कार्यालयाच्या प्रांगणात या विद्यार्थ्यांनी पायी दिंडी सोहळ्याचे सुंदर रिंगण करून पर्यावरण संवर्धनाची गीते गायली.

यावेळी प्राचार्य आशिष कुमार, यशोधनचे मुख्याधिकारी डॉ. नितीन भांड, शोभा हजारे, घुलेवाडीच्या सरपंच निर्मला राऊत, चंद्रकांत क्षीरसागर, ऋतिक राऊत यांच्यासह घुलेवाडी ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, नामदेव कहांडळ, तुषार गवांदे, अविनाश आव्हाड आदींसह सर्व शिक्षक व कार्यकर्ते उपस्थित होते.

### सुदर्शन निवासस्थानी बालगोपाळ संतांचा मेळा

वारकरी संप्रदायाचे पाईक असलेले माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या सुदर्शन निवासस्थानी चिमुकल्या वारकऱ्यांचा मेळा झाला. यामध्ये विठ्ठल, रखुमाई, संत तुकाराम, ज्ञानेश्वर यांचा सर्व वारकऱ्यांनी सुंदर अभंग गात फुगडी खेळत दिंडीचा आनंद घेतला. या सर्व बालगोपाळ विद्यार्थ्यांचे कांचनताई थोरात व डॉ. जयश्री थोरात यांनी स्वागत केले.

---

# लंडन किड्सच्या बाल वारकऱ्यांची दिंडी उत्साहात

## केडगावात 'विठोबा माऊली, ज्ञानराज माऊली तुकाराम' जयघोषात रंगला दिंडी सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** केडगाव मध्ये ज्ञानसाधना एज्युकेशन फाउंडेशन संचलित लंडन किड्स प्री स्कूलचा आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. दिंडीत श्री विठ्ठल रुख्मिणी, ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, मिराबाई , मुक्ताबाई यांच्या वेशभूषेत असलेल्या दिंडीतील चिमुकल्यांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधले.

टाळ-मृदुंगाच्या गजरात, विठु नामाच्या जय घोषात,पारंपरिक वारकऱ्यांच्या वेशभूषेत हातात भगवे ध्वज घेतलेले विद्यार्थी उत्स्फुर्तपणे दिंडीत सहभागी झाले होते. या दिंडीचे मुख्य आकर्षण ठरले ते बाल वारकऱ्यांचा रिंगण सोहळा. शाळेपासून शाहूनगर बस स्टॉप मार्गे माधवनगर मधील विठ्ठल मंदिर पर्यंत पायी दिंडी काढण्यात आली. दिंडीत सहभागी विद्यार्थ्यांनी सामाजिक संदेश देणारे फलक हातात घेतले होते.



साधु संत येता घरी, तोचि दसरा दिवाळी, हा सुख सोहळा स्वर्गी नाही, चला गजर करूया विठु माऊलीचा!, रुजवू मराठी फुलवू मराठी! चला बोलू मराठी, बेटी बचाव बेटी पढाव, एक पाऊल स्वच्छतेकडे या आशयाचे फलक विद्यार्थ्यांनी झलकवले. दिंडीत विद्यार्थ्यांसह पालक देखील सहभागी झाले होते. कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव संदीप भोर, खजिनदार प्रसाद जमदाडे, मुख्याध्यापिका रुचिता जमदाडे, सुप्रिया मुळे, कल्याणी शिंदे, सपना साबळे, प्रतिभा साबळे, जयश्री साठे, स्मिता गोवर्धन, वाळेकर मावशी, गोंदके मावशी आदींसह पालक व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

### बाल वारकऱ्यांना प्रसादाचे वाटप

विद्यार्थ्यांना आपल्या महाराष्ट्राची परंपरा असलेल्या वारकरी संप्रदायची माहिती सांगण्यात आली. उमा भोर व राजेंद्र भोर यांच्याकडून दिंडीतील बाल वारकऱ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.दिंडीचे प्रारंभ श्री विठ्ठल रुख्मिणी मूर्तिचे पूजन करून करण्यात आले. ठिकठिकाणी ग्रामस्थांनी दिंडीचे स्वागत करून पालखीची पूजा केली.

---

# 'वंचित'च्या दणक्याने रस्त्याचे काम मार्गी

### प्रा. किसन चव्हाण यांनी तळे-ससाणे दलित वस्ती रस्त्याबाबत उठविला होता आवाज

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** शेवगाव तालुक्यातील मौजे आखेगाव तळे-ससाणे दलित वस्तीकडे जाणारा रस्ता दुरुस्त करून मिळावा या करिता दि. ४ जुलै रोजी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय सदस्य तथा राज्य उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पंचायत समितीवर आंदोलन करण्यात आले.



यावेळी सदाभाऊ खर्चन, रवींद्र निळ, राजू पठाण वकील, भागवत सर, शेख सलीम जिलाणी, अरूणभाऊ खर्चन, रवींद्र ससाणे, अर्जून खर्चन, विनोद तांबे, राजूभाऊ खर्चन, राजू निकाळजे, शारदा खर्चन, शांता खर्चन, शन्नोबी पठाण, वैशाली ससाणे, शिला खर्चन, मनिषा तांबे यासह आदी उपस्थित होते.

याप्रसंगी महापुरुषांच्या जोरदार घोषणा देऊन, निष्क्रिय अधिकारी, ग्रामसेवक यांचा जाहीर निषेध करण्यात आला. राज्य उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण यांनी निष्क्रिय शासनाचा खरपूस समाचार घेतला.

---

# महात्मा फुलेंकडून समता प्रस्थापित : सकट

## मुलांसाठी पहिली शाळा सुरू केलेल्या दिनानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** महात्मा फुले यांनी मागासवर्गीय मुलांसाठी पहिली शाळा सुरू केलेल्या ऐतिहासिक दिवसानिमित्त महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त सुनील सकट यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन आगळ्यावेगळ्या पध्दतीने महात्मा फुले यांना अभिवादन करण्यात आले.

नगर-कल्याण रोड येथे झालेल्या कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.

यावेळी सुनिल सकट, सरिता आष्टेकर, रंजना बर्वे, ऋतुजा नाट, वर्षा उबाळे, निकिता उबाळे, पूजा दातरंगे,



गायत्री दातरंगे, आरती सकट, वंदना सकट आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

सुनिल सकट म्हणाले की, ३ जुलै १८५२ मध्ये महात्मा फुले यांनी मागासवर्गीय समाजातील मुलांसाठी पहिली शाळा सुरू केली. त्यांनी शैक्षणिक चळवळ चालवून समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षण कसे देता येईल यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या योगदानातून मागासवर्गीय आणि वंचित घटकांना शिक्षणाची संधी मिळाली.

महात्मा फुले यांनी समाजातील विषमते विरुद्ध लढा दिला आणि शिक्षणाच्या माध्यमातून समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. आजही त्यांचे कार्य सर्व समाजासाठी दीपस्तंभ असल्याचे त्यांनी सांगितले.

---

# ...आता मोकाट जनावरांना बसणार लगाम

## पाथर्डी नगरपरिषदेची बंदिस्त गाडी कार्यान्वित; प्रशासनाकडून जनतेला आवाहन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी नगरपरिषदेच्या वतीने शहरात वाढत्या मोकाट जनावरांच्या समस्येवर ठोस उपाययोजना म्हणून विशेष बंदिस्त गाडीची व्यवस्था करण्यात आली आहे. या गाडीच्या माध्यमातून मोकाट जनावरांना पकडून सुरक्षित स्थळी हलवण्यात येणार असून, त्यामुळे शहरातील वाहतुकीला होणारा अडथळा आणि अपघातांच्या घटना टाळण्यास मदत होणार आहे.

शहरात अनेक ठिकाणी गायी, गुरे रस्त्यावर मुक्तपणे फिरत आहेत. त्यामुळे अपघाताचा धोका वाढलेला आहे. तसेच, शहरालगतच्या शेतांमध्ये ही जनावरे घुसून उभ्या पिकांचे नुकसान करतात.



जिल्हा प्रशासनाने पाथर्डी नगरपरिषदेला मोकाट जनावरे त्यामध्ये वळू, गोमाता, गाढव, कुत्रे, डुक्करे आधी प्राण्यांना बंदिस्त करून त्यांना हलवण्याच्या सत्त सूचना केल्या आहेत. त्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने पाथर्डी नगरपरिषद मोहीम राबवण्यासाठी सुरुवात केली आहे.

या समस्येमुळे नागरिकांत तीव्र नाराजी निर्माण झाली होती. यासंदर्भात जनतेकडून तक्रारी प्राप्त झाल्यानंतर नगरपरिषदेने तातडीने हालचाली करत जनावरे बंदिस्त करण्यासाठी खास गाडीची नेमणूक केली आहे.

पाथर्डी नगरपरिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात येत आहे. नगरपरिषदेने कायद्याचा आधार घेत, मोकाट जनावरे फिरवणाऱ्यांवर कारवाईचा इशारा दिला आहे. रस्त्यावर मोकाट जनावरे फिरविल्यास पहिल्या गुन्ह्यासाठी ३ हजार रुपये दंड.

दुसऱ्या गुन्ह्यासाठी ६ महिने कारावास किंवा ५ हजार रुपये दंड नगरपरिषदेच्या क्षेत्रात परवानगीशिवाय जनावरे पाळल्यास दंड आणि गुन्हा दाखल केला जाणार आहे.

मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता अभियंता सचिन राजभोज, स्वछता निरीक्षक शुभम काळे, कार्यालयीन अधीक्षक विशाल डहाळे,शिवाजी पवार, राजेंद्र बालवे, राहूल दिनकर, गणेश दिनकर, रवींद्र दिनकर, रशीद शेख, लक्ष्मण दिनकर, खंडू दिनकर, अमोल पठारे, सरदार शेख, संजय घोरपडे, विकास दिनकर, अंबादास दिनकर, ज्ञानदेव लोखंडे आदी उपस्थित होते.

> नागरिकांनी पुढील तीन दिवसांत स्वतःच्या मालकीची गायी, गुरे यांचा बंदोबस्त करावा, अन्यथा जनावरे पकडून गोशाळेत पाठवली जातील आणि मालकांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. जनावरे पकडण्याच्या मोहिमेदरम्यान, नगरपरिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी कार्यरत राहणार आहेत. गोरक्षकांनी या मोहिमेस सहकार्य करावे.
>
> – **संतोष लांडगे, मुख्याधिकारी**

---

# ....अखेर समिती व समाजामध्ये एक मुखी ठराव मंजूर

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळ्याचे २७ जुलैला होणार अनावरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरातील मार्केटयार्ड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्या संदर्भात अनेक दिवसांपासून शहरात अनावरणाची चर्चा सुरू होती या अनुषंगाने पुतळा कृती समिती व आंबेडकरी समाजाच्या वतीने आज बैठक घेण्यात आली.

या बैठकीत एक मताने निर्णय घेऊन येणाऱ्या २७ जुलैला रविवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याचे अनावरण संध्याकाळी ६ वाजता थाटात साजरा होणार असल्याचे बैठकीचे अध्यक्ष विजय भांबळ यांनी व्यक्त केले.



यावेळी आ. संग्राम जगताप, पूर्णाकृती पुतळा समितीचे सुरेश बनसोडे, सुमेध गायकवाड, अजय साळवे, नाथा अल्हाट, किरण दाभाडे, प्रशांत गायकवाड, प्रा. जयंत गायकवाड, सुनील शिंदे, विशाल कांबळे, संजय जगताप, विशाल गायकवाड, ेताई भिंगारदिवे, बाळासाहेब निकम, संजय साळवे, अंकुश म ेाहिते, सागर ठोकळ, पप्पू पाटील, अॅड. संदीप पाखरे, विजय गायकवाड, महेश भोसले, पोपटराव जाधव, रवींद्र कांबळे, प्रा. जाधव, सिद्धार्थ आढाव, कौशल गायकवाड, विशाल भिंगारदिवे, सम ीर भिंगारदिवे, शिवाजी भोसले, नगरसेवक विजय गव्हाळे, शिवाजी साळवे, नितीन कसबेकर, गौतम सागर विधाते, भीम वाघचौरे, सुजन भिंगारदिवे, दीपक लोंढे, सिद्धांत गायकवाड, गणेश गायकवाड, शांतवन साळवे, दया गजभिये, निखिल सूर्यवंशी, शैनेश्वर पवार, रुपेश शेलार, सुभाष वाघमारे, रुपेश लोखंडे, वैभव आवटे, बापू पाचारणे, अक्षय बोरुडे, प्रकाश वाघमारे, दीपक सरोदे, ऋषी विधाते, दीपक साळवे, येशुदास वाघमारे, प्रवीण कांबळे, ऋषी कराळे, मंगेश मोकळ, दीपक गरुड आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# वारी ही धार्मिक व सांस्कृतिक परंपरा : दत्तात्रय डांगे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** आषाढ महिना सुरू झाला की महाराष्ट्रातील सर्व वारकऱ्यांना एकच ध्यास लागतो तो म्हणजे पंढरपूरच्या विठुरायला भेटण्याचा, हा ध्यास सर्वधर्मसमभाव असा जपला जाणारा एकमेव सोहळा आहे. वारी ही आपली धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना देखील समजते, असे प्रतिपादन विठ्ठल मंदिराचे विश्वस्त दत्तात्रय डांगे यांनी केले.

निर्मल नगर येथील डोके प्राथमिक विद्यालय वसई माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी निमित्त पायी दिंडी सोहळा येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात साजरा केला. याप्रसंगी मंदिराचे विश्वस्त दत्तात्रय डांगे, अर्जुन बडे, बबन वाबळे, माई पानसंबळ, मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे उपस्थित होते.

---

# 'इनरव्हील क्लब'च्या अध्यक्षपदी चोरडिया

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** इनरव्हील क्लब ऑफ अहिल्यानगरचा ३२ वा पदग्रहण समारंभ उत्साहात पार पडला. मावळत्या अध्यक्षा उज्वला भंडारी यांनी नवनिर्वाचित अध्यक्षा मधुबाला चोरडिया यांना अध्यक्ष पदाची सूत्रे सोपविण्यात आली. तर क्लबच्या वतीने १५१ वृक्षारोपण करून सामाजिक उपक्रमाची सुरवात करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून हायजिन फर्स्टच्या संचालिका वैशाली गांधी



होत्या. यावेळी पिडीसी सायली खानदेशे, सेक्रेटरी सुजाता कटारिया, खजिनदार डॉ. नीलम बागल, आयएसओ नूतन चोरडिया, लक्ष्मी काळे, उपाध्यक्षा प्रभा खंडेलवाल, प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर कांता चंगेडिया, मंगल मुथा, रेशमा चारनीया, कल्पना मुथा, मनीषा झीने, गायत्री पित्रोडा आदींसह आजी-माजी पदाधिकारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

याप्रसंगी ३१३ इनरव्हीलचे सर्व मेंबर, रोटरीचे अध्यक्ष सुनील कटारिया, रोटरीचे माजी अध्यक्ष नरेंद्र चोरडिया, ललित कर्नावट यांचा सत्कार करण्यात आला. नवीन आलेल्या सदस्यांना पिडीसी सायली खानदेशे यांनी इनरव्हीलची माहिती सांगून शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमा निसळ व लक्ष्मी काळे यांनी केले. उपाध्यक्षा प्रभा खंडेलवाल यानी आभार मानले.

---

# कर्जत नगरपंचायतच्या 'सभापती'पदी रोहिणी घुले

## राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** कर्जत नगरपंचायतच्या स्थायी समितीच्या सभापतीपदी रोहिणी सचिन घुले यांची निवड झाली आहे. तहसीलदार गुरु बिराजदार व नगरपंचायतचे मुख्याधिकारी अक्षय जायभाय हे उपस्थित होते.

कर्जत नगरपंचायत येथे विषय समिती सभापती निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या सुचनेनुसार सर्व



समित्यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती नगराध्यक्ष रोहिणी घुले यांनी दिली. या निवडीच्या वेळी उपनगराध्यक्ष संतोष मेहत्रे यांच्यासह नगरसेवक उपस्थित होते.यावेळी नगरसेवक भाऊसाहेब तोरडमल, लंकाबाई खरात, ताराबाई कुलथे, ज्योती शेळके, माया दळवी, छाया शेलार, सचिन घुले, देवा खरात, रवींद्र सुपेकर, विनोद दळवी हे उपस्थित होते.

### समितीसह सभापतींची सर्वानुमते निवड

स्थायी समिती सभापती रोहिणी सचिन घुले, आरोग्य समिती सभापतीपदी उपनगराध्यक्ष संतोष मेहेत्रे, बांधकाम समिती सभापतीपदी भास्कर भैलुमे, पाणी पुरवठा समितीचे सभापतीपदी सतीश पाटिल, तसेच महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी मोहिनी पिसाळ व उपसभापती सुवर्णा रवींद्र सुपेकर तसेच मार्केट कमिटीसाठी स्वीकृत संचालक म्हणून लंकाबाई खरात यांची सर्वानुमते निवडण्यात आले.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'संजीवनी' कटिबद्ध

## सुमित कोल्हे; इयत्ता ११ वीत प्रवेश घेतलेले विद्यार्थी व पालकांचे केले स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : विद्यार्थ्यांच्या दृष्टीने इ. ११ वी व इ. १२ वी हा आयुष्याचा महत्वाचा टप्पा असतो. पालकांच्या दृष्टीने त्यांची खरी संपत्ती ही त्यांची संतती असते. पालक मुलांवर खुप प्रेम करतात, असे असताना देखील त्यांनी आपल्या पाल्यांच्या उज्वल भविष्यासाठी मनाला मुरड घालत त्यांना घरापासुन दूर ठेवण्याचा निर्धार केला. त्यांनी डोळ्यात साठविलेले स्वप्न पुर्ण करण्यासाठी चांगला अभ्यास करा, भरपूर खेळा आणि नवनवीने कौशल्ये आत्मसात करा. पालकांनी निश्चिन्त रहावे,

संजीवनीच्या विविध संस्थांमध्ये सुमारे अठरा हजार विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे पालकांना सांगितले. तसेच संस्थेचे विविध मानस जसे आंतरराष्ट्रीय नेमबाजी प्रशिक्षण, म्युझिक अंतर्गत ब्रास बँड प्रशिक्षण व विविध देशी- विदेशी खेळांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जात आहे. वाद- विवाद, गटचर्चा यावर भर दिला जाईल. सध्याची पिढी मोबाईलच्या आहारी गेली आहे. विद्यार्थ्यांना चालू घडामोडींचे ज्ञान मिळावे म्हणून वर्तमानपत्रे उपलब्ध असतील.

**सुमीत कोल्हे**,विश्वस्त, संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्

विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकासाठी संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज कटीबध्द आहे, असे प्रतिपादन संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे विश्वस्त सुमित कोल्हे यांनी केले.

संजीवनी सैनिकी ज्युनिअर कॉलेजमध्ये नव्याने इ. ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे स्वागत कार्यक्रमात कोल्हे बोलत होते. यावेळी प्राचार्य कैलास दरेकर, सर्व विभाग प्रमुख व शिक्षक उपस्थित होते. कोल्हे पुढे म्हणाले की, ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना सैनिकी मुल्यांचे प्रशिक्षण मिळावे, ते देशाच्या संरक्षण दलात अधिकारी व्हावेत, या हेतुने माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी संजीवनी सैनिकी स्कूल अँड. ज्यु. कॉलेजची स्थापना केली. संस्थेचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर सुध्दा वेगवेगळे कीर्तिमान स्थापित करीत आहेत.




आलेल्या सर्व पालकांचे व विद्यार्थ्यांचे संजीवनी सैनिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या वतीने स्वागत करण्यात आले. सरस्वती पूजन व आदरणीय स्व. शंकरराव कोल्हे यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक सुदर्शन पांढरे यांनी केले.

# तीन महिन्यात दाखल झाल्या १० बसेस

## आ. खताळ यांच्या हस्ते ५ नवीन एसटी बसेसचे झाले लोकार्पण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : राज्यातील महायुती सरकारच्या माध्य मातून आमदार अमोल खताळ यांच्या पाठपुराव्यातून संगमनेर आगारात तीन ते साडेतीन महिन्यापूर्वी पाच एसटी बसेस दाखल झाल्या होत्या. आज शनिवारी आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला पुन्हा ५ एसटी बसेस दाखल झालेल्या आहेत. या पाचही बसेसचा आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आला.



आता संगमनेर आगारात सहा महिन्यात १० नवीन एसटी बसेस महायुती सरकारच्या माध्यमातून दाखल झाल्या आहेत.

या वेळी शिवसेना तालुकाप्रमुख रामभाऊ रहाणे, शिवसेनेचे शहरप्रमुख दिनेश फटांगरे, विनोद सूर्यवंशी, महिला जिल्हा उपप्रमुख दीपाली वाव्हळ, भाजप शहर अध्यक्ष पायल ताजने, मेघा भगत उषा कपिले आरपीआयचे शहराध्यक्ष कैलास कासार, माजी नगरसेवक ज्ञानेश्वर कर्पे, शिरीष मुळे, कैलास वाकचौरे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार, ॲड. संग्राम जोंधळे केशव जाधव उपस्थित होते.

संगमनेर आगारातील एसटी कर्मचारी चालक वाहक यांच्या ज्या काही समस्या आहे. त्या शासन दरबारी मांडून सोडविल्या जातील. बसस्थानक हे आपल्याच आहे असे मानून या प्रस्तानका देणाऱ्या प्रवाशांनी तसेच नागरिकांनी बसस्थानक आणि एसटी बसेस स्वच्छ ठेवाव्यात.

**आमदार अमोल खताळ**
सदस्य, संगमनेर विधानसभा.

# १३ गोवंशीय जनावरांची केली मुक्तता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : गोरक्षकांच्या सतर्कतेमुळे भिंगार कॅम्प पोलिसांनी कत्तल करण्याच्या उद्देशाने निर्दयतेने बांधलेल्या १ लाख २३ हजार रुपये किंमतीच्या १३ गोवंशीय जनावरांची सुटका केली. ही कारवाई नगर तालुक्यातील शहापूर शिवारा- तील दर्शन हॉटेलच्या मागील माळरानात केली.

शहापूर शिवारातील दर्शन हॉटेलच्या मागील माळरा- नात कत्तल करण्याच्या उद्देशाने अज्ञात व्यक्तीकडून गोवंशीय जातीची लहान मोठी १३ जनावरांना चारा पाणी न देता अत्यंत क्रूर आणि अमानुष अवस्थेत कत्तल करण्याच्या उद्देशाने निर्दयतेने बांधून ठेवलेली गोरक्षकांच्या निदर्शनास आली.



त्यांनी याबाबत भिंगार कॅम्प पोलीसांना माहिती दिली. पोलिसांना ही माहिती मिळताच पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन छापा टाकला असता तेथे १३ गोवंशीय जनावरे अज्ञात इसमाने बांधलेले मिळून आले.

पोलिसांना तेथे शोध घेतला असता तेथे कोणीही मिळून आले नाही. पोलिसांनी तेथून ९० हजार रुपये किमतीच्या ६ गिर जातीच्या गायी, १५ हजार रुपये किमतीची १ जर्सी जातीची गाय, ३ हजार रुपये किमतीचे खिलारी जातीचे वासरु, १५ हजार रुपये किमतीचे ५ गिर जातीचे लहान वासरु असा १ लाख २३ हजार रुपये किमतीच्या गोवंशीय जना- वरे ताब्यात घेऊन त्यांची सुटका केली.

### कोठला झोपडपट्टी येथे गोमांस जप्त

कोठला झोपडपट्टीतील घासगल्ली येथील एका पत्र्याच्या शेडमध्ये गोमांस विक्री करणाऱ्या एकाला तोफखाना पोलिसांनी पकडून त्याच्या कडून ९ हजार २०० रुपये किंमतीचे ४० किलो गोमांस तसेच वजन काटा, सत्तूर असे साहित्य जप्त केले. या प्रकरणी इरफान राजू शेख याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# प्लॉटमधून फसवणूक करणाऱ्यास अटक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नालेगाव येथील लोकमंगल गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या नावाखाली स्वस्त दरात प्लॉट मिळवून देण्याचे आमिष दाखवून शंभरहून अधिक नागरिकांची फसवणूक करणाऱ्या प्रकरणात अखेर पोलिसांनी स्वतःच्या खात्यातील अंमलदार अशोक बाळू पुंड (रा. साई गजानन कॉलनी, लेखानगर, सावेडी) याला अटक केली असून, न्यायालयाने त्याला ३ दिवसांची पोलीस कोठडी (७ जुलैपर्यंत) सुनावली आहे.

अशोक पुंड हा जिल्हा पोलीस दल- ातील अंमलदार असून, त्याची नेमणूक आर्थिक गुन्हे शाखेत होती. मात्र, गुन्ह्याची कुणकुण लागताच ते सुट्टीवर जाऊन गायब झाला होता. अखेर पोलिसांनी त्यांना अटक केल्यानंतर पोलीस अधीक्षक घार्गे यांनी त्याला खात्यातून तत्काळ निलंबीत केले.

दरम्यान, या प्रकरणातील दुसरा संशयित प्रकाश भुमय्या कोटा (रा. बालाजी सोसायटी, कल्याण रस्ता, अहिल्यानगर) याला यापू- र्वीच अटक करण्यात आली होती. या प्रकरणाची फिर्याद १२ जून रोजी कैलास नामपेल्ली उषाकोयल (वय ६१, रा. झारेकर गली, अहिल्यानगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात दाखल केली होती. उषाकोयल यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, अशोक पुंड व प्रकाश




कोटा यांच्याशी पूर्वीप- ासून ओळख होती. त्यांनी २०११ साली लोकमंगल गृहनिर्माण संस्था स्थापन करून गरीबांना ५०० चौरस फूटाचे प्लॉट अत्यंत स्वस्त दरात मिळवून देण्याचे आमिष दिले.

शासन दरबारी संपूर्ण प्रक्रिया पार पाडून प्लॉट मिळतील, असा विश्वास दिला. यावर विश्वास ठेवून फिर्यादी त्यांच्या व नातेवाइकांकडून रोख स्वरूपात सुमारे ७.२५ लाख रूपयांची रक्कम जमा करण्यात आली. मात्र, दीर्घकाळ लोटूनही प्लॉटचा ताबा मिळाला नाही, त्यामुळे अखेर त्यांनी पोलीस अधीक्षकांकडे तक्रार केली होती.

# माजी मंत्री डोणगावकर यांचे निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**



**पाथर्डी** : डोणगाव (ता. गंगापूर) येथील राज्याचे माजी मंत्री व कॉंग्रेस तसेच नंतर युतीतील लोकप्रिय नेते अशोकराव पाटील डोणगावकर (वय ८२) यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने गंगापूर विधानसभा मतदारसंघात हळहळ व्यक्त होत आहे. ते आमदार मोनिका राजळे यांचे वडील होते.

त्यांच्या पार्थिवावर रविवारी डोणगाव(जि. छत्रपती संभाजीनगर ) येथे शासकीय सन्मानाने अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. डोणगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच पदावरून त्यांनी आपल्या राजकीय वाटचालीची सुरुवात केली. त्यानंतर दोन वेळा जिल्हा परिषद सदस्य, दोन वेळा आमदार, छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक, राज्याच्या रोजगार हमी योजना समितीचे सदस्य व राज्यमंत्री अशा विविध पदांवर त्यांनी कार्य केले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# नवीन मराठी शाळेत रंगली दिंडी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : जोशी विद्यालयाचीदादा वामन जोशी नवीन मराठी शाळेने आषाढी एकादशी निमित्त बाल दिंडीचे आयोजन केले होते.

या दिंडीत डोक्यावर पांढरी टोपी, पायजमा, बंडी, धोतर या पोशाखात मुले तर रंग- बेरंगी साड्या परिधान करून डोक्यावर तुळस घेऊन मुली सहभागी झाल्या होत्या. हातात भगवे ध्वज, टाळ- मृदंगाचा निनाद त्याला वीणाची साथ, ज्ञानोबा तुकोबांचा व विठोबा रुक्माई चा जयघोष करीत गावातून निघालेल्या दिंडीने श्रीरामपूरकरांचे लक्ष वेधले होते.दिंडीत शाळेतील सुमारे १५०० हुन अधिक बाल वारकऱ्यांनी आपला सहभाग नोंदविला होता.

या दिंडी सोहळ्यासाठी तहान-भूक विसरून बाल वारकरी सकाळपासूनच शाळेत वारकरी वेशात मोठया उत्साहाने हजर झाले होते. शाळेतील बालवारकऱ्यांना पाहून विठ्ठल नामाची शाळा भरली, शाळा शिकताना तहान भूक हरली.. या ओळी ग्रामस्थ,पालकांच्या ओठी आपसूकच येत होत्या. दिंडी सोहळ्यासाठी हिंद सेवा मंडळाचे मानदसचिव संजय जोशी, वैशाली जोशी, शाळेचे चेअरमन ऋषिकेश जोशी, रेणुका जोशी, संजय छल्लारे, अशोक उपाध्ये, बालवाडी विभागाचे चेअरमन सुशील गांधी, स्कूल कमिटी सदस्य अमोल कोलते, गोपाल उपाध्ये, रत्नमाला गाडेकर, अरुण धर्माधिकारी, संजय कासलीवाल, चंद्रकांत सगम, विजय सेवक, तसेच रमाताई धीवर, प्रशासकीय अधिकारी बी. एस. कांबळे सर यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले.

# रयत शिक्षण संस्थेच्या खर्डा हायस्कूलला लावले टाळे

## शाळेत दहा शिक्षकांची कमतरता; पालकांमध्ये संतापाचे वातावरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : खर्डा येथील रयत शिक्षण संस्थेच्या खर्डा हायस्कूलला १० शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ लागल्याने पालक संतप्त झाले व त्यांनी शाळेला कुलूप ठोकल्याने शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

खर्डा येथे रयत शिक्षण संस्थेचे खर्डा इंग्लिश स्कूल शाळेमध्ये पाचवी ते बारावी पर्यंत शिक्षण वर्ग सुरू असून या ठिकाणी २ हजार विद्यार्थ्यांचे पटसंख्या आहे.

गेली दीड वर्षापासून नववी ते दहावी माध्यमिकला पाच शिक्षकांची पदे रिक्त आहेत. अकरावी ते बारावी सायन्स ॲग्रीला तीन वर्षापासून शिक्षक उपलब्ध नाही. कॉमर्सला दोन वर्षापासून शिक्षक पद रिक्त आहे. फिजिक्स विषयाचे शिक्षक यांची बदली झाली असल्याने व एक



शिक्षक प्रमोशनवर गेल्याने ती जागा रिक्त आहे.

या संदर्भात शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन लोळगे यांनी संस्थेचे सचिव, सहसचिव संस्थेचे जनरल बॉडी सदस्य आमदार रोहित पवार, उत्तर विभागाचे इन्स्पेक्टर घोडके यांच्याशी प्रत्यक्ष भेटून लेखी स्वरुपात शिक्षक देण्याची मागणी केली होती. तरीही त्याची दखल घेतली नाही.

संस्थेला दोन जुलै २०२५ पर्यंत खर्डा इंग्लिश स्कूल शाळेला दहा शिक्षक रिक्त पदावर भरले नाही. तर पाच जुलै रोजी खर्डा शाळेला कुलूप ठोकण्याचा इशारा दिला होता. त्यानुसार सचिन लोळगे यांनी शिक्षक देण्यासाठी इन्स्पेक्टर घोडके यांच्याशी फोनवरून पुन्हा चर्चा केली असता त्यांनी आरेरावीची भाषा वापरली असल्याचे लोळगे यांनी सांगितले. त्यानंतर संतप्त पालक व लोळगे यांनी खर्डा शाळेला कुलूप ठोकले.

# कोल्हारच्या 'गुरुकुल संपदा' स्कूलमध्ये अवतरली पंढरी

## आषाढी एकादशी जल्लोषात साजरी; सर्व पालक झाले मंत्रमुग्ध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : अवघ्या महाराष्ट्रातील वारकऱ्यांचे आराध्य दैवत विठ्ठल रुक्मिणी व त्या अनुषंगाने आषाढी एकादशीला ओसंडून वाहणारा व मंत्रमुग्ध करणारा भक्ती भाव कोल्हार भगवतीपूर येथील संस्कार संपदा व गुरुकुल संपदा या स्कूलमध्ये विठ्ठल नामाच्या गजरात दंग होऊन उत्स्फूर्तपणे व मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

कोल्हार बुद्रुक येथील संस्कार संपदा व गुरुकुल संपदा स्कूलचे संचालक सुधीर रायभान आहेर व संचालिका सारिका सुधीर आहेर यांच्या हस्ते पालखी पूजन, दिंडीचे स्वागत तसेच विठ्ठल-रुक्मिणीचे पूजन ,बाल वारकऱ्यांचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी रिंगण सोहळा, स्वस्तिक सोहळा, कळस सोहळा, विठ्ठल गंध, पावली अशा प्रकारच्या वेगवेगळ्या पद्धतीने विठ्ठल रुक्मिणीच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली.

युगानयुगे करकरटेवर हात ठेवणाऱ्या आपल्या लाडक्या



विठोबाची आरती सर्व पालक वृंद, विद्यार्थी शिक्षक वृंद यांच्या समवेत संचालक सुधीर आहेर व संचालिका सारिका सुधीर आहेर यांच्या हस्ते करण्यात आली. यानंतर प्री- प्रायमरीच्या चिमुकल्या वारकऱ्यांनी कीर्तनाच्या गजरात - गजर कीर्तनाचा हे मनमोहक नृत्य सादर केले.प्रायमरीच्या विद्यार्थ्यांनी 'अशी पंढरी' हे नृत्य सादर करून अवघ्या पंढरीचे दर्शन घडवले.

कार्यक्रमांमध्ये पालक, शिक्षक सर्व कर्मचारी वर्गाने सहभाग घेत वारीच्या परंपरेला मान दिला व सर्व विद्यार्थ्यांनी पांढऱ्या कपड्यांमध्ये गळ्यात तुळशी माळ आणि मुखात विठ्ठल नाम घेत हा अनमोल उत्सव साजरा करण्यात आला.

### विठ्ठल नामाचा झाला गजर

विटेवर उभ्या असणाऱ्या कधीही न थकणाऱ्या व न दमणाऱ्या सर्व संसाराचा भार पेलणाऱ्या आपल्या विठ्ठल रुक्मिणीच्या हळूवार पावलांनी भक्तिमय वातावरणात विठ्ठलाच्या नामाच्या गजरात अवघा परिसर सेकंडरीच्या विद्यार्थ्यांच्या नृत्याने व विविध कलाकृतींनी दुमदुमला.

## 'गुरुकुलसंपदा'मध्ये अवतरली पंढरी





















## संपादकीय

### महापूर भक्तीचा...

आषाढी एकादशीला 'देवशयनी एकादशी' असेही म्हणतात. या दिवशी वारकरी संप्रदायाचे लाखो भक्त पंढरपूरला विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी 'वारी' करून येतात. वारी म्हणजे भक्तीचा महासागर. शेकडो किलोमीटर पायी चालत, टाळ-मृदुंगांच्या गजरात, जय जय राम कृष्ण हरी आणि 'ग्यानबा-तुकाराम'च्या जयघोषात ही यात्रा पार पडते. संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज यांच्यासह अनेक संतांच्या पालख्या आल्हाददायक वातावरणात पंढरपूरमध्ये पोहोचतात. एकादशीच्या दिवशी उपवास, नामस्मरण आणि विठ्ठलाच्या चरणी समर्पण हे भक्तांचे वैशिष्ट्य असते. ही परंपरा केवळ धार्मिकच नाही तर सामाजिक ऐक्याचे प्रतीकही आहे. विविध जातधर्माचे लोक येथे एकत्र येतात आणि एकमेकांशी प्रेमाने वागतात. एकमेकांच्या पायी लागतात. त्यामुळेच आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, अध्यात्मिक आणि सामाजिक जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. पंढरपूरला आलेला प्रत्येकजण विठ्ठलाचा भक्त असतो, वारकरी असतो. त्यापलीकडे कोणाचं कोणतंही अस्तित्व नसतं. त्या सावळ्या रुपाचं दर्शन घेताना वारकऱ्यांचे डोळे प्रेमाने भरुन येतात. विठ्ठल, विठ्ठल, जय हरी विठ्ठल, असं अखंड नामस्मरण सुरू असतं. मुखात विठ्ठल, हृदयात विठ्ठल, सर्व चराचरात विठ्ठल, फक्त विठ्ठल, विठ्ठल अशीच प्रत्येकाच्या मनीची भावना असते. सर्व वातावरण चैतन्यमयी झालेले असते. चंद्रभागेच्या तिरी भक्तीचा महापूर आलेला असतो. महाराष्ट्रातल्या अठरापगड जाती आपला नित्य उद्योग थोडा काळ बाजूला ठेवून, पंढरीला जातात. कारण विठोबा म्हणजे त्यांचे परब्रह्मच होय. वारकऱ्यांच्या बाबतीत अत्यंत पवित्र स्थळ म्हणजे पंढरपूर. आषाढी, कार्तिकी, माघी आणि चैत्री या पंढरपूरच्या मुख्य वाऱ्या होत. प्रा. शं. वा. दांडेकर वारकऱ्यांची व्याख्या करताना म्हणतात, 'आषाढी, कार्तिकी, माघी अथवा चैत्री यापैकी एका शुध्द एकादशीला गळ्यात तुळशीची माळ घालून, नियमाने पंढरपुरास जातो तो 'पंढरपूरचा वारकरी' म्हटला जातो. त्याच्या उपासनेचा मार्ग म्हणजे 'वारकरी पंथ' होय.' संत ज्ञानदेवांनी या पंथाला तत्वज्ञानाचे अधिष्ठान दिले तर संप्रदाय प्रवर्तकाचा मान मात्र पुंडलिकाकडे जातो. मातृपितृभक्त पुंडलिक आपल्या आई-वडिलांची सेवा करत असताना भगवान श्रीकृष्ण भेटायला आले. आपल्या सेवेत व्यत्यय येऊ नये म्हणून त्याने जवळची वीट पुढे करुन त्यांना थांबायला सांगितले, अशी आख्यायिका आहे. या गोष्टीला २८ युगे लोटली तरी पांडुरंग कंबरेवर हात ठेवून उभा आहे, अशी विठोबाच्या भक्तांची कल्पना आहे. पुंडलिक हा भक्तश्रेठ होता. त्याच्या भावार्थासाठी पांडुरंग त्याच्याकडे येऊन विटेवर उभा आहे, ही कथा संतांनी वर्णिली आहे. याविषयी तुकाराम महाराज म्हणतात, ज्ञानेश्वरपूर्व काळातच महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगण या प्रदेशातून लोक विठोबाच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे येत होते, वारीची पध्दती कोणी घालून दिली, याची माहिती मिळत नसली तरी ती प्रथा ज्ञानेश्वरपूर्व काळातच सुरु झाली होती हे मात्र निश्चित. ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत हे आषाढी-कार्तिकी वारीला पंढरपुरी गेल्याचा उल्लेख नामदेवांनी केला आहे. इ.स. सहाव्या शतकात विठ्ठलदेवतेची प्रसिध्दी झाली होती. त्या अगोदर दोन-तीनशे तरी वर्षे देवस्थानाचे अस्तित्व धरायला हरकत नाही. पुंडलिकाचा काळ त्या आधीचा असण्याची शक्यता आहे. इसवी सनाच्या तेराव्या शतकाचा उत्तरार्ध व चौदाव्या शतकाचा पूर्वार्ध हा ज्ञानदेव आणि नामदेव यांचा काळ. हा वारकरी संप्रदायाच्या भरभराटीचा काळ होता. संत ज्ञानेश्वर हे या कालखंडाचे स्फूर्तिस्थान आहेत असे म्हटले तर वावगे ठरु नये. महाराष्ट्रातल्या बहुजन समाजातली गोरोबा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, सेना न्हावी, परिसा भागवत, जनाबाई, चोखामेळा इत्यादी संतमंडळी ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीत होती. या अठरापगड जातीच्या संतांनी आपल्या अभंगवाणीने विठ्ठल महिमा गाजवला. हे करताना त्यांनी सामाजिक चौकटीत राहूनच कार्य केले, हे विशेष होय, त्यासाठी सामाजिक जीवनाची मोडतोड करण्याची गरज त्यांना वाटली नाही. वास्तविक पाहता ज्ञानेश्वरांचे स्फूर्तिस्थान नाथ संप्रदाय होय. नाथ संप्रदायाच्या मुळाशी केवळ योगच नसून भक्तीचा निर्झर आहे, ही गोष्ट त्यांनी स्पष्ट केली.

संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेवांनी वारकरी पंथाची दारे आबालवृध्द, स्त्री-पुरुष तसेच सर्व जातीजमातींना खुली केली. देवाच्या दरबारात कोणी उच्च नाही की कोणी नीच नाही; तर हृदयात भक्तिप्रेम असणारे सर्वच सारखे आणि देवाचे लाडके असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे पंढरपूर हे सार्वजनिक क्षेत्र ठरले. विठ्ठल हा महाराष्ट्रातला एक प्रमुख देव आणि वारकरी समाजाची उपास्यदेवता म्हणून सर्वांना माहीत आहे. भगवान विष्णूंचा अवतार असणारे भगवान श्रीकृष्ण आणि तत्स्वरुपी विठ्ठल यांची भक्ती महाराष्ट्र-कर्नाटकमध्ये प्राचीन काळापासूनच रुढ आहे. विठ्ठलाचे वारकरी भगवान विष्णूंशी संबंधित असणारे एकादशी व्रत निष्ठेने आचरत असतात. विष्णूंना तुळस अत्यंत प्रिय असून ते तिच्या काष्ठमण्यांच्या माळा गळ्यात घालतात. 'काला' हा गोकुळातल्या बाळकृष्णाचा एक प्रसाद आहे. विठ्ठलाच्या वारीची सांगता काल्याविना होत नाही.

द्वारकेचा राणा गायी-गोपाळांसह पंढरीच्या पुंडलिकाला भेटायला आला आणि त्या वेळेपासून तो जो उभा आहे, तो अजून खाली बसलाच नाही. इथे मातृ-पितृप्रेमाची महती किती मोठी आहे हे परमेश्वराने दाखवून दिले आहे. विठ्ठल या शब्दाच्या अनेक व्युत्पत्ती आहेत. कै. राजवाडे यांच्या मते 'विठ्ठळ' या शब्दावरुन विठ्ठल हे रुप तयार झाले. 'विठ्ठल' म्हणजे दूर, रानातली जागा किंवा स्थळ यावरुन विठ्ठल देव म्हणजे रानात राहणारा देव असा अर्थ होतो. डॉ. रा. गो. भांडारकर म्हणतात की, विष्णू या संस्कृत शब्दाचे कानडी अपभ्रंश रुप 'बिट्टी' होते आणि या अपभ्रंशापासून विठ्ठल हा शब्द तयार झाला. बीम्स या गौडी भाषेच्या अभ्यासकाने म्हटले आहे की विष्णूचा 'विठ्ठ' हा अपभ्रंश आर्य-प्राकृत भाषांच्या नियमानुसार होतो. आषाढीच्या वारीला संताच्या पालख्या पंढरीला येतात. आषाढी-कार्तिकी या वाऱ्यांना प्रत्येक फडावर दशमी ते पौर्णिमा भजने आणि कीर्तने होतात. रात्री हरिजागर असतो. पौर्णिमेला सर्व दिंड्या पंढरपूरपासून जवळच असणाऱ्या गोपाळपुरी इथे जातात, तिथे 'काला' होतो. यावेळी काल्याच्या लाह्या एकमेकांच्या मुखी घालून वारकरी आपल्या वारीची सांगता करतात. वारकरी संप्रदाय हा मानवी जीवनात ईश्वरी प्रेमाची अनुभूती घेऊन जीवन खऱ्या अर्थाने समृध्द करण्याचा भक्ती हा सुलभ मार्ग सांगणारा पंथ आहे.

# आखाती संघर्ष आणि जागतिक झळ

**परामर्श**

**– हेमंत देसाई**
**ज्येष्ठ पत्रकार**



इराण आणि इस्रायलदरम्यानचे युध्द झडले आणि अमेरिकेच्या इराणवरील बाँबहल्ल्यानंतर शांत झाले. मात्र मधल्या काळात परिणामस्वरुप महागाई वाढली आणि तेलाचा व्यापार संकटात येईल, अशी शक्यता बोलून दाखवली जाऊ लागली. आज ही शक्यता दिसत नसली तरी अशा घडामोडींचा जागतिक अर्थकारणावरील प्रभाव हा एक महत्वाचा मुद्दा आहे.

इराण आणि इस्रायलदरम्यानचे युध्द आजघडीला शांत दिसत असले तरी नजिकच्या भविष्यकाळात पुन्हा पेटणार नाही, अशी खात्री आज कोणीच देताना दिसत नाही. हे युध्द त्या दोन देशांमध्ये झडले आणि अमेरिकेच्या इराणवरील बाँबहल्ल्यानंतर शांत झाले. मात्र मधल्या काळात परिणामस्वरुप महागाई वाढली आणि तेलाचा व्यापार संकटात येईल, अशी शक्यता बोलून दाखवली जाऊ लागली. आज ही शक्यता दिसत नसली तरी अशा घडामोडींचा जागतिक अर्थकारणावरील प्रभाव हा एक महत्वाचा मुद्दा आहे. तो सर्वच देशांना सदोदीत लक्षात ठेवावा लागतो. मध्य पूर्व हा जगातील तेल उत्पादनाचा एक प्रमुख भाग आहे. जगातील सुमारे २५ टक्के तेल व्यापार इराण आणि होर्मुझच्या आखातासारख्या त्याच्या आसपासच्या भागातून होतो. इस्रायल आणि इराणमधील युद्ध आत्ता शांत झाले असले तरी पुढे पुन्हा भडकले, तर तेलाच्या पुरवठ्यात व्यत्यय येऊ शकतो. शिपिंग मार्ग बंद होऊ शकतात आणि तेल टँकरवर हल्ल्याचा धोका वाढू शकतो. यामुळे तेलाच्या किमती गगनाला भिडू शकतात. त्याचा परिणाम अलिकडेच दिसून येऊ लागला होता. गेल्या काही दिवसांमध्ये तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. कच्च्या तेलाच्या किमती प्रति पिंप ७८ डॉलर्सवर पोहोचल्या. यामुळे भारतासारख्या देशांमध्ये पेट्रोल, डिझेल आणि स्वयंपाकाच्या गॅसच्या किमती वाढू शकतात. परिणामी, सामान्य लोकांचा खर्च वाढेल. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे महागाईदेखील वाढेल. तेलाचा वापर केवळ वाहनांसाठी नाही, तर वस्तूंच्या उत्पादनासाठी आणि ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठीदेखील केला जातो. कच्चे तेल महाग झाल्यास वाहतुकीचा खर्च वाढेल. त्यामुळे अन्नपदार्थ आणि दैनंदिन वस्तूंच्या किमती वाढू शकतात. यामुळे भारतासारख्या देशांमध्ये मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांवर भार वाढेल. दोन्ही देशांमधील युद्धापूर्वी, महागाई नियंत्रणात असल्याचे दिसून येत होते आणि यामुळेच अलिकडच्या काळात अनेक मोठ्या अर्थव्यवस्थांच्या मध्यवर्ती बँका त्यांच्या देशांमधील बँकांना दिलेल्या कर्जावरील व्याजदर कमी करत होत्या. 'बँक ऑफ इंग्लंड'ने अलीकडेच ब्रिटनचा बेस इंटरेस्ट रेट ४.२५ टक्के केला. भारतीय रिझर्व्ह बँकेनेही अलिकडेच प्रमुख रेपो रेट ५० बेसिस पॉइंट्सने कमी केला. तथापि, ट्रम्प यांच्या 'टॅरिफ वॉर'मुळे अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने दर कपात कमी न करता 'जैसे थे' ठेवले आहेत.

आज अमेरिकेच्या हस्तक्षेपामुळे थांबलेले इराण-इस्रायल युद्ध भविष्यात पुन्हा अनुभवायला मिळू शकते. ते नेहमीच जागतिक व्यापारात अडथळा आणू शकते. होर्मुझची सामुद्रधुनी हा जगातील तेल व्यापाराचा एक प्रमुख मार्ग आहे. दोन्ही देशांमधील तणावामुळे हा मार्ग बंद झाल्यास जहाजांना लांब मार्गाने जावे लागू शकते. यामुळे वस्तूंच्या वाहतुकीचा खर्च वाढेल आणि विम्याच्या किमतीही वाढू शकतात. तेल आयातीवर अवलंबून असलेल्या भारतासारख्या देशांच्या निर्यातीवर परिणाम होऊ शकतो. भारतातून कापड, तांदूळ आणि मसाल्यासारख्या वस्तूंच्या निर्यातीवर त्याचा परिणाम होऊ शकतो. दोन्ही देशांमधील युद्धाच्या बातमीने अलिकडच्या काळात शेअर बाजारातही खळबळ उडाली. याचा भारतीय शेअर बाजारावरही परिणाम झाला. काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे की भीतीपोटी गुंतवणूकदार सोने किंवा चांदीसारख्या सुरक्षित ठिकाणी आपले पैसे गुंतवत आहेत. सोन्याची किंमत वाढली आहे. डॉलर मजबूत झाला आहे. त्यामुळे शेअर बाजारात घसरण दिसून येत आहे. तथापि, या तणावाचा काही बाजारपेठांवर अद्याप फारसा परिणाम झालेला नाही. भारतातील सेन्सेक्स आणि निफ्टी सारख्या भांडवली बाजारावर गेल्या काही दिवसांपासून सातत्याने दबाव दिसतो आहे. युद्धाचा जागतिक पुरवठा साखळीवरही परिणाम होतो. जागतिक पुरवठा साखळी बंद पडल्याने इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल्स आणि औषधे यासारख्या उद्योगांचे नुकसान होऊ शकते. यामुळे कारखाने बंद होऊ शकतात आणि बेरोजगारी वाढू शकते.

अलिकडच्या काळात अनेक विमान कंपन्यांनी मध्य पूर्वेतील उड्डाणे स्थगित किंवा रद्द केली तर काही देशांनी त्यांचे हवाई क्षेत्र बंद केले. मध्य पूर्वेतील सर्वात मोठी विमान कंपनी असलेल्या एमिरेट्सने सांगितले की त्यांनी इराक, जॉर्डन, लेबनॉन आणि इराणला जाणारी आणि जाणारी उड्डाणे ३० जूनपर्यंत स्थगित केली. एतिहाद एअरवेजने अबू धाबी आणि तेल अवीव दरम्यानची उड्डाणे रद्द केली. कतार एअरवेजने इराण, इराक आणि सीरियाला जाणारी उड्डाणे तात्पुरती रद्द केली. मध्यपूर्वेत पुन्हा एकदा भडका उडाल्यामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत ताबडतोब दहा टक्क्यांनी वाढ झाली. ३० मे २०२५ रोजी कच्च्या तेलाचे दर ६२ डॉलर प्रति बॅरल इतक्या खाली घसरले होते. परंतु यात वाढ होत दर ७८ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले. त्याचप्रमाणे लगेच शेअर बाजारातही घसरण झाली. अर्थात जागतिक अस्थिरता निर्माण झाल्यामुळे सोने दहा ग्रॅमला एक लाख रुपयांवर गेले. बऱ्याचदा आंतरराष्ट्रीय व्यापारात अडथळे येतात आणि शेअर बाजार कोसळतो, तेव्हा गुंतवणूकदार सोन्याकडे वळतात. या वेळी असेच घडले. इस्रायलने इराणच्या दोन तेल आणि नैसर्गिक वायू शुद्धीकरण प्रकल्पांवर हल्ले केले. इराण हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा तेल उत्पादक देश आहे.

कच्च्या तेलाच्या किमती वाढत गेल्यास तेलविक्री कंपन्यांना पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढवाव्या लागतात. यामुळे वाहतूक, अन्नपदार्थ तसेच इतर वस्तू महाग होऊ शकतात. इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धामुळे सर्वाधिक फटका आधीच कर्जबाजारी असलेल्या पाकिस्तानलाही बसला. तिथे पेट्रोल आणि डिझेलचे भाव भारताच्या तुलनेत दुपटीने वाढले. पाकिस्तानच्या हाय स्पीड डिझेलच्या किमतीत प्रति लिटर सुमारे आठ आणि पेट्रोलच्या किमतीत प्रति लिटर चार रुपये ८० पैसे पाकिस्तानी रुपयांची वाढ करण्यात आली. आता तिथे हाय स्पीड डिझेल २६२ रुपये प्रति लिटर तर पेट्रोल २५८ रुपये प्रति लिटर झाले आहे. अगोदरच युक्रेन-रशिया आणि इस्रायल-हमास संघर्षाचे जगातील वस्तू बाजार किंवा कमोडिटी मार्केटवर विपरीत परिणाम झाले आहेत. इस्रायल-इराण तणावामुळे एका आठवड्यात कच्च्या तेलाचे भाव सोळा टक्क्यांनी वधारले. इराणने होरमुझ सामुद्रधुनी व्यापारासाठी बंद करण्याचे अतिरेकी पाऊल उचलू नये, यासाठी बरेच देश प्रयत्नशील राहिल्याचे गेल्या काही काळात पहायला मिळाले. भारतात ८७ टक्के खनिज तेल आयात केले जाते. त्यापैकी बरेचसे तेल होरमुझच्या मार्गाने आणले जाते. तेलाचे दर वाढले की आयातखर्च वाढून वित्तीय तूट मर्यादेबाहेर जाते. अशा वेळी रिझर्व्ह बँकेला व्याजदरवाढीचा पर्याय स्वीकारावा लागतो आणि तसे झाल्यास उत्पादनवृद्धीवर प्रतिकूल परिणाम होतो.

२०२१ च्या दिवाळीनंतर कच्च्या तेलाचे भाव बॅरलला ८५ डॉलरपर्यंत पोहोचले तेव्हा देशातील पेट्रोल आणि डिझेलचे भावही विक्रमी पातळीवर पोहोचले होते. पेट्रोल आणि डिझेलचा अर्थव्यवस्थेवर व्यापक परिणाम होत असतो. त्यामुळे अन्नधान्यापासून खतांपर्यंत आणि दूध-अंड्यापासून फळे-भाजीपाल्यापर्यंत सर्व वस्तू प्रचंड महाग झाल्या होत्या. तेव्हा टोमॅटो ८० रुपये किलो आणि कोथिंबिरीची एक जुडी सव्वाशे रुपयाला गेली होती. इतकी महागाई कधी कुणी पाहिली आहे का? २०१८ नंतर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे भाव इतके कधीही वाढले नव्हते. २०२१ अखेर जगभर कोरोनाचे संकट निवळत चालले होते. त्यामुळे अर्थव्यवस्थांना उभारी मिळू लागली. परिणामी, सर्वच वस्तूंची मागणी वाढत चालली आणि त्याचे पर्यवसान इंधनांच्या किमती वाढण्यात झाले. त्यावेळी जगातील प्रमुख तेल उत्पादक देशांनी तेलाचे भाव वधारले असतानाही उत्पादनात टप्प्याटप्प्यानेच वाढ करण्याचे ठरवले होते. २०२० मध्ये ब्रेंट क्रुडची किंमत बॅरलला ४२ डॉलर होती. २०२१ अखेर ती दुपटीवर गेली. अशा वेळी मागणीच्या तुलनेत उत्पादन आणि पुरवठा मोठ्या प्रमाणात वाढला असता, तर भाव खाली आले असते. परंतु तेल निर्यातदारांची 'ओपेक' ही संघटना तसेच तेल उत्पादकांचा दुसरा एक समूह यांच्या बैठकीत केवळ प्रति दिन चार लाख बॅरल्सनेच उत्पादन वाढवण्याचा निर्णय झाला.

कोव्हिडच्या काळात अनेक देशांनी प्रवासबंदी असल्यामुळे कच्च्या तेलाच्या उत्पादनकपातीचा निर्णय राबवण्यात आला. परंतु कोविड महामारी संपल्यानंतर मागणीमध्ये लक्षणीय वाढ होत असूनही, तेलसंपन्न देशांनी त्यानुसार उत्पादन वाढवले नाही. सध्या चलनफुगवट्याचा दर २.५ टक्क्यांवर आळा असून आणखी पाव टक्क्याने घसरेल, असा अंदाज केंद्र सरकारच्या ग्राहक कामकाज विभागाने व्यक्त केला आहे. परंतु, तेलाचे दर चढे राहिल्यास आणि अतिपावसामुळे पिकांचे नुकसान झाल्यास, भाववाढीचे संकट पुन्हा उद्भवू शकते, हे लक्षात घेतले पाहिजे.

# वारकरी संप्रदायाच्या विचारात देश बदलण्याची ताकद

## माजी मंत्री थोरात; युवक काँग्रेसच्या वतीने बाळासाहेब थोरात यांचा सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** पायी दिंडी सोहळा ही महाराष्ट्राची समृद्ध परंपरा असून डॉ. जयश्री थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुक्यातील ५०० युवकांनी या दिंडीमध्ये सहभाग घेऊन वारकऱ्यांची सेवा केली. पंढरपूर आलेल्या या सर्व युवकांनी माजी मंत्री थोरात यांचा तुळशीहार देऊन सत्कार केला असून सर्व संतांचे विचार हे राज्यघटनेमध्ये असून वारकरी संप्रदायाच्या विचारात देश बदलण्याची ताकद असल्याचे प्रतिपादन मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर तालुक्यातील वारीमध्ये सहभागी झालेल्या युवकांनी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात यांचा सत्कार केला यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर कारखान्याचे उपाध्यक्ष पांडुरंग घुले, इंद्रजीत थोरात, शंकर खेमनर, डॉ. जयश्री थोरात, अजय फटांगरे, मिलिंद कानवडे, संपतराव डोंगरे, सुधाकर जोशी, सोमेश्वर दिवटे, अर्चना बालोडे, सुभाष सांगळे, विश्वासराव मुर्तडक, नवनाथ आरगडे यांच्यासह कारखान्याचे सर्व संचालक उपस्थित होते. यावेळी या युवकांनी विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती फोटो फ्रेम व तुळशीहार देऊन माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचा सत्कार केला.

डॉ. जयश्री थोरात म्हणाल्या की, वारीचा अनुभव हा अविस्मरणीय होता. तरुणांनी या वारीमध्ये अत्यंत उत्साहाने सक्रियपणे सेवा केली. वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये अनेक माणसे भेटतात माऊली या एका शब्दाने सर्वजण बांधले जातात. हा समतेचा विचार आहे मानवतेचा विचार आहे हाच विचार घेऊन तरुणांनी काम केले पाहिजे. कारण ती आपली समृद्ध परंपरा आहे. संगमनेर तालुका हा संत महात्मे आणि वारकरी संप्रदायाला मानणारा असल्याचे हि त्या म्हणाल्या.



> महाराष्ट्राला वारीची शेकडो वर्षांची मोठी समृद्ध परंपरा आहे. वारीमध्ये सर्वजण भेदभाव विसरून एकत्र येतात. हा मोठा भावनिक आनंद असतो. जीवनामध्ये एकदा तरी वारी अनुभवावी. शेकडो वर्षांची परंपरा संत महंतांनी सांगितलेले समितीचे विचार तरुणांनी जोपासले पाहिजे. हे सर्व समतेचे आणि मानवता धर्माचे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेमध्ये उतरवले आहे.
> **– बाळासाहेब थोरात, माजी मंत्री**

# टाळ-मृदूंगाच्या निनादात बाल वारकऱ्यांची दिंडी उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** भुतकरवाडी येथील स्ट्रॉबेरी लिटिल स्टार प्री प्रायमरी स्कूलची आषाढी एकादशीनिमित्त काढण्यात आलेली बाल वारकऱ्यांची दिंडी उत्साहात पार पडली. या दिंडीत श्री विठ्ठल-रुक्मिणी, ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम महाराज व विविध संत व वारकऱ्यांच्या वेशभूषेत सहभागी झालेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधले.

पांढरी टोपी, कपाळी गंध, पायजमा, बंडी या पोशाखातील लहान मुले, तर रंगीबेरंगी साड्या परिधान करुन मुली डोक्यावर तुलसी वृंदावन घेऊन आपल्या पालकांसह दिंडीत सहभागी झाल्या होत्या. ज्ञानोबा... तुकाराम... च्या जयघोषाने परिसर निनादला. भुतकरवाडी परिसरातून या दिंडीचे मार्गक्रमण झाले. या चिमुकल्यांची दिंडी पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. तर दिंडीतील पालखीचे चौका-चौकात स्वागत करण्यात आले.

शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांचा रिंगण सोहळा पार पडला. महादेव मंदिराच्या परिसरात दिंडीची सांगता झाली. शालेय संचालिका स्वाती डोमकावळे यांच्या मार्गदर्शनाखाली बालकांची दिंडी रंगली होती.

जिल्हा उद्योग कार्यालय व समृद्धी महिला बहुउद्देशीय सोसायटी अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने युवक कल्याण योजनेअंतर्गत दिंडीतील बालकांची आरोग्य तपासणी करुन त्यांच्या पालकांना मुलांच्या सदृढ आरोग्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.



> लहान मुले म्हणजे विकसित होणारे शरीर आणि तेजस्वी होत जाणारे मन, त्यांना वाढीसाठी आणि ऊर्जा मिळवण्यासाठी अधिक पोषणाची गरज असते. जर बालपणात त्यांना योग्य आणि संतुलित आहार दिला गेला, तर त्यांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते, शारीरिक व बौद्धिक विकास चांगला होत आहे. **– डॉ. गणेश मिसाळ**

# कार-दुचाकीच्या अपघातात दोन जण ठार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** तालुक्यातील पुनतगाव फाट्याजवळ शनिवारी दुपारी कार व मोटारसायकलच्या अपघातात दोघांचा मुत्यू झाला तर १ जण जखमी झाला आहे. अमोल उर्फ शिवाजी भाऊसाहेब दारकुंडे (वय ३२) निवृत्ती ज्ञानेश्वर पवार (वय ५६, दोन्ही रा. पुनतगाव ता. नेवासा) अशी मयतांची नावे आहेत.

शनिवार दिनांक ५ जून रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास विक्रम भीमा आढाव रा. शिरजगाव ता. येवला जिल्हा नाशिक हे आपल्या दोन मित्रांसमवेत मित्राच्या मारुती रिट्स कारने भालगाव (ता. नेवासा) येथे स्वतः करिता सेकंड हँड कार पाहण्यासाठी श्रीरामपूरकडून नेवाशाकडे येत असतांना पुनतगाव फाट्याच्या जवळ नेवाशाकडून एका मोटर सायकलवर तिघेजण येत असताना मोटर सायकल घसरून पडल्याने ती कारखाली आली आल्याने दोघे जण कारखाली रगडले गेले व पाठीमागे बसलेला तिसरा इसम बाजूला फेकला गेला. कार चालकाने कार थांबून पाहिले असता दो-घेजण गंभीर जखमी झालेले होते. कार चालक विक्रम आढाव हा आपले दोन्ही मित्रांसह रस्त्याने जाणाऱ्या दुसऱ्या वाहनाला हात करून पोलीस ठाण्यात आला व पोलिसांना अपघाताची माहिती दिली.

पान १ वरुन पान १ वरुन पान १ वरुन

## ... अखेर २० वर्षांनंतर राज-उद्धव एकत्र

राज ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांना टोला लगावला.

उद्धव ठाकरे म्हणाले की, बऱ्याच वर्षांनी माझी आणि राजची भेट व्यासपीठावर झाली आहे. सन्माननीय राज ठाकरे असा उल्लेख करतो. राज यांनी अतिशय चांगली मांडणी केली आहे. आज आजच्या भाषणापेक्षा आमच एकत्र दिसणं महत्वाच आहे. आमच्या दोघांतील अंतरपाट अनाजी पंतांनी दूर केला. आता अक्षता टाकायची गरज नाही. एकत्र आलो आहे एकत्र राहण्यासाठी, असे त्यांनी म्हटले.

ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदार आदित्य ठाकरे आणि त्यांचे चुलत भाऊ मनसे नेते अमित ठाकरे यांनी देखील मराठीच्या मुद्द्यावरून आयोजित विजय जल्लोष मेळाव्यासाठी एकत्र आले होते. यावेळी, शेजारीच उभ्या असलेल्या खासदार सुप्रिया सुळेंनी अमित ठाकरे आणि आदित्य ठाकरेंना हाताला धरुन पुढे घेतले. त्यानंतर राज ठाकरेंच्या शेजारी आदित्य आणि उद्धव ठाकरेंच्या शेजारी अमित यांना उभे करत आत्याबाईंची भूमिका बजावल्याले बघायला मिळाले.

## गोदावरी कालव्यांना ओव्हर फ्लोचे पाणी द्या

समाधानकारक पाऊस झालेला असून अधून मधून आषाढ सरी सुरु आहे. त्यामुळे नांदूर मधमेश्वर बंधाऱ्यातून गोदावरी नदीमध्ये जवळपास १० ते १२ हजार क्युसेक विसर्ग सुरु असून जायकवाडी धरणामध्ये जिवंत पाणी साठा ४६ टक्के इतका झाला आहे. तर दुसरीकडे मात्र गोदावरी कालवे बंद आहे.

## विद्यार्थ्यांच्या हृदयस्पर्शी रिंगण सोहळ्याने संस्कृतीचे दर्शन

लोणी गावातील प्रमुख मार्गावरुन सुरु झालेल्या या दिड्यांचा प्रवास ऊन, पावसाची सर झेलत रिंगण सोहळ्याच्या मैदानाकडे विठू नामाचा जयघोष करीत रवाना झाल्या. विद्यार्थी, विद्यार्थीनी, पालक, शिक्षक यांनी परिधान केलेली वेशभूषा, हातामध्ये भगवे झेंडे आणि टाळ-मृदुंगाच्या गजरात ज्ञानोबा माऊली तुकाराम असा जयघोष करीत या दिंडी सोहळ्यात सर्वजन रंगून गेल्याचे चित्र पाहायला मिळाले.

रिंगण सोहळ्याच्या मैदानाकडे सर्व दिंड्या रवाना होत असताना राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, हभप उध्दव महाराज मंडलिक, जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, प्रवरा अभिमत विद्यापीठाच्या विश्वस्त सुवर्णा विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासह सर्व संस्थाचे पदाधिकारी आणि वारकरी सांप्रदायातील सर्व प्रतिनिधी या दिंडीमध्ये सहभागी झाले.

विठू नामाचा जयघोष करीत वारकऱ्यांचा हा मेळा सैनिकी स्कुल समोरील प्रांगणात दाखल झाला. सर्वांच्या सहभागाने या मैदानावर रिंगण सोहळ्याच्या मैदानावर प्रति पंढरपूर अवतरले होते. भगव्या झेंड्याची पताका नाचवत घोड्यांचा सहभाग असलेला रिंगण सोहळा संपन्न होत असताना सर्वांना पंढरपुरच्या वारीमध्ये साकारले जाणारे रिंगणच अनुभवण्याची संधी काल मिळाली.

सहभागी असलेल्या विद्यार्थी वारकऱ्यांचे टाळ्यांच्या गजरात सर्वांनी स्वागत करुन, अभिनंदन केले. मंत्री विखे पाटील आणि शालिनीताई विखे पाटील यांची व्यासपीठावरील फुगडी तसेच जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे आणि डॉ. सुजय विखे पाटील यांची फुगडी सर्वांचेच लक्ष वेधून घेणारी ठरली.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले की, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांचे वारकरी सांप्रदायावर असलेले योगदान हे सर्वश्रृत होते. त्याच विचारांनी प्रवरा परिवाराची अध्यात्मिक क्षेत्रात सुरु असलेली वाटचाल ही येणाऱ्या पिढीलाही संस्कारीत करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

हभप उध्दव महाराज मंडलिक यांनी हा सोहळा पाहताना आम्हाला साक्षात पंढरपुरची आठवण येत आहे. जे वातावरण पांडुरंगाच्या भूमीत निर्माण होते. तसेच वातावरण आता या शिक्षणाच्या माहेर घरात निर्माण झाले असून, डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या पुढाकाराने आयोजित केलेला हा अनोखा सोहळा अध्यात्मिक क्षेत्रामध्ये लक्ष वेधून घेणारा ठरला असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील म्हणाले की, या अध्यात्मिक सोहळ्यात विद्यार्थी, पालक, सर्व शिक्षक यांचा उत्साह हा कौतुक करण्यासारखा आहे. एखाद्या शिक्षण संस्थेने पुढाकार घेवून साक्षात वारीचे दर्शन घडविणारा सोहळा आयोजित करुन, पंढरपुरच्या अध्यात्मिक सोहळ्याचा आनंद सर्वांना मिळवून दिला असल्याचे त्यांनी सांगितले.

# आता पोलिसही घेणार 'एआय'चा आधार

## गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यासाठी होणार मदत : एसपी घार्गे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** राज्यात गुन्हेगारीच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यात दिवसेंदिवस गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असून, गुन्हेगार देखील त्यांच्या कार्यपध्दतीत बदल करत आहेत. त्यामुळे पोलिसांसमोरही नवे आव्हान उभे राहिले आहे. मात्र, यावर मात करण्यासाठी पोलीस दल तंत्रज्ञानाच्या मदतीने अधिक प्रभावी कामगिरी करत असून, लवकरच कृत्रिम बुध्दिमत्ता (एआय) आधारित प्रणालीचा वापर करून गुन्हेगारांवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न होणार आहे, अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.



अधीक्षक घार्गे यांनी सांगितले की, जिल्ह्यातील महत्त्वाच्या शहरामध्ये सॅटेलाइज सीसीटीव्ही प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. यामुळे गुन्हा घडल्यानंतर लगेचच संबंधित परिसरातील सीसीटीव्ही फुटेजद्वारे आरोपीचा माग काढणे शक्य झाले आहे. मात्र, सीसीटीव्हीला मर्यादा असून आरोपी नेमका कोण, त्याची पार्श्वभूमी काय, याची माहिती मिळत नाही. त्यामुळे आता याच प्रणालीत एआय तंत्रज्ञान समाविष्ट करून, गुन्हेगाराच्या हालचालींवर लक्ष ठेवता येईल, असा प्रयत्न सुरू आहे. एकदा आरोपी सीसीटीव्हीत आल्यावर तो जिथे जाईल तिथल्या कॅमेऱ्यांत तो ओळखला जाईल, त्यानुसार त्या स्पॉटवर रेड ॲलर्ट किंवा सायरन सुरू होईल, अशी यंत्रणा उभारण्याचा आमचा मानस आहे, असे अधीक्षक घार्गे म्हणाले.जिल्ह्यात मावा व सुगंधी तंबाखू तयार करणाऱ्या कारखान्यांविरोधात सुरू असलेली कारवाई आणखी तीव्र होणार आहे. यासाठी विशेष पथक तयार करण्यात आले असून, अशा व्यवसायांची मुळे खणून काढण्याचे धोरण राबवले जात आहे. सध्या जिल्ह्यात ३२ पोलीस ठाण्यांची संख्या असून ती अपुरी पडत आहे. जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीचा विचार करता किमान ८ नव्या पोलीस ठाण्यांची गरज आहे. जिल्ह्यासाठी ४० पोलीस ठाण्यांची आवश्यकता आहे. त्यासाठी प्रशासनस्तरावर पाठपुरावा सुरू असल्याचे अधीक्षक घार्गे यांनी सांगितले.

### शाळा परिसरातील टपऱ्या हटणार

शाळा व महाविद्यालय परिसरात असणाऱ्या अवैध टपऱ्यांवर लवकरच धडक कारवाई होणार आहे. या टपऱ्यांमधून मावा, सुगंधी तंबाखू सहज मिळते आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या लोकांचे हे थांबे बनतात. त्यामुळे यापुढे शैक्षणिक संस्थांच्या परिसरात अशा टपऱ्या दिसणार नाहीत, असा इशाराही पोलीस अधीक्षक घार्गे यांनी दिला.

# भोसले आखाड्यात डेंग्यूमुक्त जनजागृती मोहीम

## आयुक्त यशवंत डांगे यांचा शालेय विद्यार्थ्यांशी संवाद



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** आपले नगर शहर साथरोग मुक्त व्हावे, याकरिता महानगरपालिकेचा आरोग्य विभाग सतर्क आहे. डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने १५ जून ते ११ ऑक्टोबर पर्यंत डेंग्यू मुक्त अहिल्यानगर शहर अभियान राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून बुरुडगाव रोडवरील भोसले आखाडा परिसरामध्ये विषाणूजन्य आजारांबाबत जनजागृती करण्यात आली.

यावेळी महापालिका आयुक्त तसा प्रशासक यशवंत डांगे यांनी शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांना डासांबाबत विचारलेले प्रश्न व त्यांनी दिलेले उत्तरे ऐकून सर्वच जन अवाक झाले. शालेय विद्यार्थी हे उद्याच्या उज्ज्वल भारताचे भविष्य असून त्यांचे आरोग्य सुदृढ व निरोगी राहण्यासाठी महापालिका आरोग्य विभाग कटिबद्ध आहे असेही आयुक्त डांगे यावेळी म्हणाले.

यावेळी मार्गदर्शन करताना माजी उपमहापौर गणेश भोसले म्हणाले की, महानगरपालिकेच्या या जनजागृती उपक्रमामध्ये नागरीकांचा सहभाग देखील आवश्यक आहे. यावेळी माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे सामाजिक कार्यकर्ते संजय चोपडा, डॉ. सतीश राजुरकर, प्रभाग अधिकारी एस. व्ही. तडवी, डॉ. दिलीप बागल, डॉ. राहूल झंवर, डॉ. आयेशा शेख, डॉ. सृष्टी बनसोडे, जयप्रकाश सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

मनुष्याच्या शरीरामध्ये रोगप्रतिकारशक्ती कमी झाल्यास मनुष्याला विविध आजाराने ग्रासले जाते विद्यार्थ्यांनी आपले शहर डेंगू मुक्त करण्यासाठी आपल्या घराची व परिसरातील साठलेल्या पाण्याचे फोटो काढून महापालिकेकडे पाठवावे,मलेरिया या आजाराचा शहरांमध्ये एकही रुग्ण आढळत नाही त्याच धर्तीवर डेंगूचाही एकही रुग्ण आढळणार नाही अशा पद्धतीने नागरिकांमध्ये जनजागृती केली जाईल व डेंगू मुक्त शहर करण्याचा मानस असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

# डॉक्टरांनी उतरविला डोक्यावरील गाठीचा डोंगर

## साईबाबा हॉस्पिटलमध्ये पार पडली शस्त्रक्रीया

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी :** अकोला जिल्ह्यातील तरूणाच्या डोक्यावर आलेल्या गाठीच्या गोळ्याची अत्यंत क्लिष्ट शस्त्रक्रीया श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये पार पडली. रूग्णालयातील डॉक्टरांनी ही शस्त्रक्रीया केली. अनिकेत भानुदास इंगळे, रा.चत्तरी ता-पातुर जि. अकोला येथील २१ वर्षीय तरुणाच्या डोक्यावर जन्मजात छोटी असलेली गाठ कालांतराने वाढत जावुन ४.९ किलो वजनाची झाली. डोक्यावर गाठीचा जणु डोंगरच झाला होता. यातून माझी कशी सुटका होईल, हाच एक प्रश्न रुग्णाला कायम सतावत होता. शेवटी कंटाळून त्यांनी साईबाबा हॉस्पिटल शिर्डी येथे धाव घेतली. येथे हॉस्पिटलमध्ये आल्यानंतर डॉ. अजिंक्य पानगव्हाणे यांनी त्यांची संपुर्ण तपासणी करुन त्यांचेवर शस्त्रक्रिया केली.



या यशस्वी शस्त्रक्रियेबद्दल श्री साईबाबा विश्वस्त व्यवस्था, शिर्डीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, गोरक्ष गाडीलकर, (भा.प्र.से) उप मुख्य कार्यकारी अधिकारी, भिमराज दराडे, रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक, लेफ्ट कर्नल, डॉ.शैलेश ओक आदींनी त्यांचे कौतुक केले.

# राहात्यात ३७ हजार हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणी; १४० मेट्रिक टन युरिया खुला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** तालुक्यात यंदा खरीप हंगामाला वेळे आधीच सुरूवात झाली असून आज अखेर तब्बल ३७ हजार ५०० हेक्टर क्षेत्रावर पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ६४ हजार ८९५.७९ हेक्टर असून खरीपाचे सरासरी क्षेत्र ४४ हजार ४४७ हेक्टर आहे.



यंदा मान्सूनचे आगमन साधारण १५ दिवस आधी झाल्याने पेरण्या वेळीच झाल्या असून शेतकऱ्यांकडून युरियाच्या वाढत्या मागणीला प्रतिसाद म्हणून कृषी विभागाने २८० मेट्रिक टन युरिया संरक्षितसाठा मंजूर केला आहे. यातील १४० मेट्रिक टन युरिया १ जुलै रोजी खुला करण्यात आला असून ३ जुलै रोजी उर्वरित १४० मेट्रिक टन संरक्षित साठाही शेतकऱ्यांसाठी खुला करण्यात आला आहे. युरिया, सिंगल सुपर फॉस्फेट व पालाश यांच्या मिश्रणाचा वापर डीएपीला पर्याय ठरतो. तसेच मोनो अमोनियम फॉस्फेट व प्रोम डीएपी चा वापरही शेतकरी करू शकतात. तालुक्यातील शेतकऱ्यांनी उपलब्धतेनुसार पर्यायी खतांचा वापर करावा व अधिक माहितीसाठी कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी आबासाहेब यांनी केले आहे.

### मिश्र खतांचा वापर करावा

डीएपी खताचा पुरवठा मर्यादित असल्याने पर्यायी मिश्र खतांचा वापर करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे. डीएपीमध्ये १८ टक्के नत्र व ४६ टक्के स्फुरद असते. त्याऐवजी लिक्विड नॅनो डीएपी, तसेच १०:२६:२६, १२:३२:१६, २०:२०:०, २४:२४:० या मिश्र खतांचा योग्य प्रमाणात वापर करूनही परिणाम साधता येतो.



# वीजवितरणचा स्मार्ट कारभार चव्हाट्यावर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** राज्य शासन मोठमोठ्या घोषणा करत सर्वसामान्य नागरिकांना अनेक धक्के देत आहे. यात वीज ग्राहकांना जुने मीटर बदलून त्याजागी स्मार्ट मीटर बसवून दिले जात आहेत. मात्र संबंधित ठेकेदाराकडून हे काम गुणवत्तापूर्वक केले जात आहे की नाही? याकडे महावितरणच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

नगर तालुक्यातील सारोळा बद्धी येथे महावितरण कार्यालयाकडून स्मार्ट मीटर बसवण्यात आलेले आहेत. मात्र या स्मार्ट मीटरचा फज्जा उडाला असून अनेक मीटर भिंतीवर बसवण्याऐवजी चक्क लटकवलेल्या अवस्थेत दिसून येत आहेत. तसेच जुने विद्युत मीटर हे चक्क कचऱ्यात फेकून दिल्याचे चित्र उघडकीस आले आहे. एकीकडे एकीकडे शासन स्मार्ट सिटी, स्मार्ट मीटर या गोष्टींवर काम करत असून दुसरीकडे मात्र महावितरणकडून ठेकेदाराने घेतलेल्या कामांचा अक्षरशः फज्जा उडाला असल्याचे पहायला मिळत आहे. त्यामुळे स्मार्ट मीटर नावाला स्मार्ट म्हणून उरले कि काय? असा सवाल उपस्थित होत आहे.

### ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी

संबंधित ठेकेदाराने पूर्वीचे असणारे विद्युत मीटर अक्षरशः फेकून देत स्मार्ट मीटर दरवाजाला अडकवल्याचे प्रकार नगर तालुक्यात उघडकीस झाले आहेत. तरी संबंधित ठेकेदारावरती योग्य ती कारवाई करावी अशी मागणी नागरिकांमधून जोर धरू लागली आहे. हे स्मार्ट मीटर धोकादायक पद्धतीने अनेक भिंतींवर लटकवल्याने नागरिकांच्या जीविकास धोका निर्माण झाला आहे. याबाबत महावितरण प्रशासनाकडून काय कारवाई करण्यात येते याकडे नागरिकांचे लक्ष लागून आहे.

# स्व. ससाणेंचे स्वप्न पूर्ण करणार

## करण ससाणे; गरजवंत विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** स्व. जयंतराव ससाणे नेहमी सांगायचे की, संघटना ही आपले कुटुंब आहे. त्यांनी दाखवलेल्या मार्गावर आपण आणि आपली संघटना कार्य करत राहिलं आणि त्यांचे अपूर्ण राहिलेले स्वप्न आपल्या सर्वांच्या साथीने पूर्ण करू, असे प्रतिपादन जिल्हा सहकारी बँकेचे संचालक करण ससाणे यांनी म्हटले.



माजी आमदार स्व.जयंतराव ससाणे यांच्या जयंतीनिमित्ताने माजी आ. स्व. जयंतराव ससाने मित्र मंडळ, आ. हेमंत ओगले मित्र मंडळ आणि श्रीरामपूर विधानसभा काँग्रेस कमिटीच्या वतीने आझाद मैदान येथे गरजवंत विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात आले याप्रसंगी ससाणे बोलत होते. जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सचिन गुजर म्हणाले की, आपण स्वतःला नशीबवान समजतो की, आपल्याला स्वर्गीय ससाणे यांच्या सोबत जवळून काम करण्याची संधी मिळाली. अनेक मोठ्या पदांवर काम करत असताना पाय मात्र जमिनीवर ठेवायचे. तळागाळातील जनतेला न्याय कसा देता येईल ही भूमिका त्यांची असायची त्यामुळेच अशा अटीतटीच्या लढतीत देखील विधानसभेवर आपले उमेदवार आ. हेमंत ओगले यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणू शकलो, असल्याचे म्हटले. डॉ . वंदनाताई मुरकुटे, बाबसाहेब दिघे, यांनी आपल्या भाषणात स्व. ससाणे यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देत अभिवादन केले.यावेळी सूत्रसंचलन मुज्जफर शेख यांनी केले तर आभार तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले यांनी मानले. बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, शिवसेना जिल्हा उपाध्यक्ष सचिन बडदे, अशोक थोरे, नगरसेवक मुजफ्फर शेख, अनिल ढोकचौळे, मास्टर सरवरअली, रितेश एडके, सुनील शिंनगारे त्यांच्यासह आदींचे भाषणे झाले.

# रस्ता लूट करणाऱ्या तिघांना अटक

## लोणीव्यंकनाथ शिवारातील घटना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** नगर-दौंड राष्ट्रीय महामार्गावरील लोणी व्यंकनाथ शिवारातील एका ढाब्यासमोर ट्रक लावून झोपलेल्या चालकाचा मोबाईल चोरुन पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या राजू ऊर्फ राजवीर लक्ष्मण भोसले, आप्या लक्ष्मण भोसले, ईशा लक्ष्मण भोसले, (सर्व रा. श्रीगोंदा फॅक्टरी) यांना अटक करण्यात आली आहे.

दरम्यान, यावेळी पळून जाणारा एक आरोपी दुचाकीवरून पडून जखमी झाला आहे. आरोपींना लोणीव्यंकनाथचे पोलिस पाटील मनोज जगताप व युवकांनी पकडून श्रीगोंदा पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

या प्रकरणी सुरेंद्रकुमार रामखिलावन प्रजापती (रा. पुरेधार मंगल, चांदपुर, राजगड, राज्य उत्तर प्रदेश) यांनी फिर्याद दिली आहे.

आरोपीकडून पोलिसांनी बॅटरी, कात्री व रापी जप्त केली असून गुरुवारी मध्य रात्री ही घटना घडली. सुरेंद्रकुमार प्रजापती हे ट्रकचे केबीनमध्ये झोपलेले असताना तेथे हे तीन आरोपी, तसेच अनोळखी एक इसम यांनी हातातील बॅटरीचा उजेड फिर्यादीच्या डोळ्यावर चमकावून कात्री व रापी सारखी दिसणारी धारधार वस्तूचा धाक दाखवून लाथाबुक्यांनी मारहाण करुन मोबाईल फोन चोरला व दगडफेक केली. पुढील तपास हवलदार संजय वाघमारे करत आहेत.

# श्री गणेश मूर्ती बनविण्यासाठी मुर्तीकारांची लगबग

## ५० दिवसांवर येवून ठेपला गणेशोत्सव; मूर्तींची किंमती वाढणार?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** वर्षभर वाट पाहण्यास लावणाऱ्या लाडक्या बाप्पाचे आगमन अगदी थोड्या दिवसांवर आले आहे. त्यामुळे शहरातील मुर्तीकरांचीही लगबग सुरू झालेली आहे. अनेक मुर्तीकारांनी आपल्या कामास सुरूवात देखील केली आहे.

लहान मुलापासून ते अगदी घरातील वयस्कर आजोबा पर्यंत सगळे अगदी आपल्या लाडक्या बाप्पाची आतुरतेने वर्षभर वाट पाहत असतात. अवघ्या ५० दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सव घरगुती व सार्वजनिक मंडळे मोठ्या प्रमाणात साजरा करतात. शहरात ठिकठिकाणी ढोलताशा पथकाचा आवाज कानावर पडला कि लाडक्या बाप्पाची तयारी चालू होते. काही गणेश मंडळांची तयारी देखील चालू झाली आहे. वर्षभर वाट पाहण्यास लावणाऱ्या लाडक्या बाप्पाचे आगमन अगदी थोड्या दिवसावर आले आहे.

गणेशमूर्ती तयार करण्याचे काम बलिप्रतिपदा (पाडवा) झाला कि सुरवात होते. पण यावर्षी गणेश मूर्ती बनवण्यासाठी बरेच विघ्न आले. उच्च न्यायालयाने प्लयस्टर ऑफ पॅरिसला बंदी घातल्यामुळे बरेच कारखानदारा मध्ये निराशा होती.त्यामुळे कारखानदारांना मूर्ती बनवण्यास वेळ अपुरा मिळाला. नवीन मूर्ती तयार करू शकले नाही. यावर्षी ९ जून २०२५ रोजी उच्च न्यायालयाने प्लास्टर ऑफ पॅरिस वरील बंदी उठवली. त्यामुळे गणेश मूर्ती बनवणाऱ्या कारखानदारास नवचैतन्य निर्माण झाले.



अहिल्यानगर मधील गणेश मूर्तींना देशभरात मोठी मागणी आहे. हैद्राबाद, गुजरात, कर्नाटक, गोवा या राज्यातून गणेश मूर्तींना मोठ्या प्रमाणात मागणी आहे. यावर्षी गणेश मूर्ती तयार करण्यासाठी लागण्याऱ्या कच्च्या मालाचे भाव देखील वाढलेले आहेत. कारागिरांची मजुरी वाढली असल्यामुळे साधारण किमतीत ३० टक्के वाढ झाली आहे.

घरगुती गणेश मूर्ती पासून ते २० फुटापर्यंत मूर्ती तयार केली जातात. त्याला मागणी हि त्याच पटीत आहे. दगडूशेठ, पद्मासन, लालबाग, उंदीर रथ, शंखावरील गणेश मूर्ती, श्री राम अवतार, शंकर महाराज रूपातील गणेश मूर्ती तयार आहेत. तसेच शाडूच्या माती मूर्तींना देखील चांगली मागणी आहे. काही कारखान्यात मूर्ती विक्री चालू झाली आहे. ६ इंचापासून ते २० फुटापर्यंत च्या मूर्ती साधारणतः १२० रु.पासून ते १.५० लाखापर्यंत मूर्ती किंमत आहे. शाडू मातीच्या मूर्तींच्या किमती ४०० रु.ते २ हजारापर्यंत आहेत.

अहिल्यानगर मधील गणेश मूर्तींना देशभरात मोठी मागणी आहे. हैद्राबाद, गुजरात, कर्नाटक, गोवा या राज्यातून गणेश मूर्तींना मोठ्या प्रमाणात मागणी आहे. ९ जून २०२५ रोजी मा.उंच न्यायालयाने प्लयस्टर ऑफ पॅरिस वरील बंदी उठवली. त्यामुळे गणेश मूर्ती बनवणाऱ्या कारखानदारास नवच्यात्यां निर्माण झाले. तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री साहेब यांनी सहकार्य केल्यामुळे कारखानदारांमध्ये जगण्याची नवसंजीवनी निर्माण झाली.

**प्रफुल लाटणे, (मूर्तिकार) शिजीनगर, कल्याणरोड**

उन्हाळा कालावधीत गणेश मूर्ती तयार करून पूर्णपणे सुकवली जाते. मूर्ती सुकल्यानंतर त्यावर घासकाम, फिनिशिंग, सफेदा मारून रंगकामास मूर्ती तयार होते. लाडक्या बाप्पाचे आगमन थोड्या दिवसावर येऊन ठेपल्यामुळे मूर्ती बनवण्याचे काम सध्या अहोरात्र चालू आहे. नगर शहरात जवळपास १००-१२० मूर्ती निर्मिती कारखाने आहेत. या कारखान्यात जवळपास शहरातील ८-१० हजार कारागीर काम करीत आहे. त्यामुळे कारागीर व महिला कामगार याना उपजीविकेचे साधन निर्माण झाले आहे. त्यांच्या कौशल्यावर त्यांना रोजगार मिळतो. आज च्या युगामध्ये महिला कारागीर देखील या कामामध्ये मागे नाहीत.

# युवकांनो, संगमनेरची सुसंस्कृत परंपरा टिकवा

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात; थोरात कारखाना येथे काँग्रेसचे नूतन तालुकाध्यक्ष फटांगरे यांचा सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संतांचा समतेचा विचार हा राज्यघटनेमध्ये आहे. काँग्रेसचा विचार हा शाश्वत विचार असून तरुणांना काँग्रेसमध्ये मोठी संधी आहे. तालुक्यामध्ये काही लोक दांडगाई करू पाहत आहे. अशा लोकांना वेळीच रोखले पाहिजे. हा तालुका सुसंस्कृत विचारांचा आहे. आपली राजकीय सुसंस्कृत परंपरा जपत येणाऱ्या काळात चुकीच्या गोष्टींना उत्तर द्यावेच लागेल, असे प्रतिपादन काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

### युवकांसाठी वारीचा अनुभव संस्मरणीय : डॉ. थोरात

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील ५०० युवक वारीमध्ये सहभागी झाले. अभंग, फुगड्या, भजन असा विठ्ठलाचा नामाचा गजर करत या वारीमध्ये सर्वजण स्वतःला विसरून सहभागी झाले होते. जीवनात एकदा तरी वारी करावी असे सांगताना सोलापूर जिल्ह्यामध्ये प्रचंड झालेली ट्रॅफिक हटवण्यासाठी संगमनेरच्या युवा वारकऱ्यांनी केलेली मदत कौतुकास्पद ठरली आहे.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना येथे काँग्रेसचे नूतन तालुकाध्यक्ष अजय फटांगरे यांचा सत्कार समारंभ कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी ज्येष्ठ नेते पांडुरंग घुले, इंद्रजीत थोरात, मावळते अध्यक्ष मिलिंद कानवडे, डॉ. जयश्री थोरात, शंकरराव खेमनर, सुधाकर जोशी, विश्वासराव मुर्तडक, सोमेश्वर दिवटे, अर्चनाताई बालोडे, संपतराव डोंगरे, नवनाथ आरगडे, सुरेश झावरे, सुभाष सांगळे, रावसाहेब दुबे आदींसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.



माजी मंत्री थोरात म्हणाले की, संगमनेर तालुक्याला संघर्षाचा इतिहास आहे. अनेक वर्षांच्या कामातून हा तालुका उभा राहिला आहे. सुसंस्कृत राजकीय परंपरा ही आपली ओळख आहे. मात्र सध्या तालुक्यात वातावरण चुकीचे होत आहे. ज्येष्ठ व तरुणांना एकत्र येऊन संघर्ष करावा लागेल. दमदाटी दांडगाईचा बंदोबस्त करावा लागेल. आपण सुसंस्कृत आहोत. पण चुकीचे कोणी वागत असेल तर ते होऊ देणार नाही. यावर कार्यकर्त्यांनी ठाम झाले पाहिजे.

> माजी मंत्री थोरात यांच्या नेतृत्वाखाली आपण कायम काँग्रेस पक्षाचा विचार खेडोपाडी नेण्यासाठी काम केले आहे. पक्षाने व नेतृत्वाने मोठी संधी आहे. आपली ताकद मोठी असून एकत्रितपणे संघर्षाच्या काळात काम करून पुन्हा काँग्रेसला वैभव प्राप्त करून देऊ यासाठी आपण कटिबद्ध राहणार आहे.
>
> **– अजय फटांगरे**

अनेक लोक विष कालवण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा चुकीच्या गोष्टींना वेळीच उत्तर द्यावे लागेल. तालुक्याची सुसंस्कृत राजकीय संस्कृती टिकवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आगामी काळात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका या निवडणुका मोठ्या मताधिक्याने आपल्याला जिंकायचे आहेत. आपसातील मतभेद दूर ठेवून जनकल्याणाचा व संतांचा विचार असलेला काँग्रेसचा शाश्वत विचार घेऊन प्रत्येकाने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. अजय फटांगरे यांनी सातत्याने युवक संघटन केले असून आ. सत्यजित तांबे यांचे फायटिंग असलेले हे व्यक्तिमत्व सर्वांना सोबत घेऊन जाणारे असल्याचे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नवनाथ आरगडे यांनी केली. तर सोमेश्वर दिवटे यांनी आभार मानले. यावेळी संगमनेर तालुका काँग्रेसचे पदाधिकारी अमृत उद्योग समूहातील विविध संस्थांचे पदाधिकारी व युवक काँग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंदी सक्तीविरोधात ‘ठाकरें’चा आवाज घुमला

## पाथर्डीत शिवसैनिकांकडून जल्लोष; ठाकरे बंधूंच्या एकतेचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : केंद्र सरकारच्या हिंदी सक्तीच्या विरोधात शिवसेनेचे उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी एकत्रितपणे मराठी अस्मितेसाठी भूमिका घेतल्याने राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

काल, शनिवारी सकाळी नाईक चौकात उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तालुका प्रमुख भगवान दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसैनिकांनी फटाके फोडून आणि जोरदार मराठी घोषणांनी परिसर दणाणून टाकत आनंदोत्सव साजरा केला.

> ठाकरेंची ही एकता केवळ राजकीय नाही, तर ती मराठी भाषिक अस्मितेची आणि आत्मगौरवाची आहे. ठाकरे बंधूंचे एकत्र येणे हे मराठी जनतेच्या आत्मविश्वासाचे पुनरुत्थान आहे. हिंदी सक्तीचा विरोध हा आपल्या अस्तित्वाचा लढा आहे. आजचा जल्लोष हे त्याचे प्रतीक आहे.
>
> **– भगवान दराडे**

या ऐतिहासिक आणि भावनिक क्षणाचा जल्लोष पाथर्डी शहरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

उद्धव... राज... साहेब यांचा विजय असो, मराठीचा जयजयकार असावा, मराठी माणूस झुकणार नाही‘‘ अशा घोषणांनी चौकात मराठी अस्मितेचा नारा घुमवला.



या कार्यक्रमास नवनाथ चव्हाण, रामकिसन भिसे, नंदकुमार डाळिंबकर, सचिन नागपुरे, अंकुश आव्हाड, फुलचंद चिमटे, गौतम वाघ, किशोर गाडेकर, बबन शेळके, विकास दिनकर, नवनाथ उगलमुगले, जमाल पठाण, विष्णू शिरसाट, पांडुरंग सकुंडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

नवनाथ चव्हाण म्हणाले की, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र येऊन मराठी जनतेसाठी एक दिशा दिली आहे. आम्ही त्यांच्या या निर्णयाचे मनापासून स्वागत करतो. हा आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. या ऐक्यामुळे मराठी अस्मिता आणि हक्कांच्या लढ्याला नवसंजीवनी मिळणार आहे.

या जल्लोषातून ठाकरे बंधूंच्या एकतेचे स्वागत करण्यात आले असून, आगामी निवडणुकीत स्थानिक स्वराज्य संस्थांवर शिवसेना आणि मराठी जनतेचे वर्चस्व अधिक बळकट होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# धरण सुरक्षा समितीवर शिवाजी बोलभट यांची नियुक्ती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे या अंतर्गत असलेल्या धरणांच्या सुरक्षेबाबत अवलोकन करणेसाठी महाराष्ट्र शासनाने सर्वसमावेशक धरण सुरक्षा पुनरावलोकन समिती नियुक्त केली आहे.

या समितीच्या सदस्य पदावर अहिल्यानगरचे जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील सोनेगाव येथील रहिवासी व सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग शिवाजी बोलभट यांची सदस्य म्हणून नियुक्ती करणेत आली आहे. उत्कृष्ट अधिक्षक अभियंता म्हणून बोलभट यांचा राज्यपाल यांच्याकडून यापूर्वी गौरव झालेला आहे.



### बोलभट यांना राज्यपालांच्या हस्ते पुरस्कार

अधीक्षक अभियंता पदावर असताना बिड, लातूर, उस्मानाबाद, जालना, परभणी, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातील जायकवाडी धरणासह इतर धरणावर व्यवस्थापनाचे काम केले आहे. यापूर्वी राज्यपालांच्या हस्ते उत्कृष्ट कार्यकारी अभियंता म्हणून शिवाजी बोलभट यांना पुरस्कार मिळाला आहे.

श्री शिवाजी बोलभट हे जामखेड तालुक्यातील सोनेगाव येथील रहीवासी असून त्यांनी यापूर्वी भंडारदरा जलविद्युत प्रकल्प, मुळा प्रकल्प, उजनी प्रकल्प, खडकवासला, पानशेत, वरसगाव, टेमघर, पवना, चासकमान,कुकडी प्रकल्प (पाच धरणे), नीरा देवघर, गुंजवणी प्रकल्प येथे अधिक्षक अभियंता म्हणून अहिल्यानगर, सोलापूर, पुणे आणि सातारा जिल्ह्यात उत्कृष्ट काम केले आहे. त्यांच्या निवडीमुळे शासनाला धरण क्षेत्रात एक तज्ञ सदस्य मिळाला आहे. त्यांच्या निवडीचे अहिल्यानगर जिल्ह्यातून अभिनंदन होत आहे.

# लंडनमध्ये होणार अर्थतज्ज्ञ डॉ. प्रशांत भालेराव यांचा गौरव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह अर्बन क्रेडिट सोसायटीचे संस्थापक व ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रशांत चंद्रकांत भालेराव यांची निवड लंडन ऑर्गनायझेशन ऑफ स्कील डेव्हलपमेंट या संस्थेच्या वतीने जगभरातील २५ सर्वश्रेष्ठ उद्योजकांमध्ये करण्यात आली आहे. यानिमित्ताने त्यांना येत्या १६ जुलै रोजी लंडनच्या हाऊस ऑफ पार्लमेंट येथे गेस्ट ऑफ ऑनर या सन्मानाने गौरवण्यात येणार आहे.



या कार्यक्रमात डॉ. भालेराव नवउद्योजकांसमोर आपले मार्गदर्शन सादर करणार आहेत. विशेष म्हणजे, या निवडीसाठी व्यावसायिक यश, सामाजिक बांधिलकी आणि पारदर्शक व्यवस्थापन या निकषांचा विचार करण्यात आला आहे.

या आधीही डॉ. भालेराव यांना विविध राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. मात्र, आंतरराष्ट्रीय पातळीवरील हा गौरव त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

डॉ. भालेराव यांनी महाराष्ट्रासह ९ राज्यांत १३९ शाखांद्वारे श्री रेणुकामाता मल्टीस्टेट सोसायटीचे जाळे उभारले आहे. तसेच रेणुकामाता इन्फो सोल्युशन्स, ब्रिव्हरेज प्रायव्हेट लिमिटेड, चंद्रकांत मंगळ व्हेंचर्स आणि रेणुकामाता प्रॉडक्शन हाऊस यासह विविध क्षेत्रातील यशस्वी कंपन्यांचे ते प्रमुख आहेत.

# वाहतुकीचा प्रश्न सोडविल्याने एसपी घार्गेंचा सन्मान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शहरातील अवजड वाहतुकीचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल चर्मकार विकास संघाच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचा सत्कार करण्यात आला.

### तात्काळ कारवाई करण्याचे आश्वासन

नगर शहरातील चौकात विशेष करून डीएसपी चौकात लहान मुले घेऊन महिला भिक मागणे, सिग्नल सुरू झाल्यानंतर सुद्धा वाहनाच्या पाठीमागे धावून बळजबरीने भीक घेणे, वस्तू विक्री करणाऱ्यांची असलेली वर्दळ असल्याने यामुळे देखील मोठा अपघात होऊन जीवितहानी होण्याचा धोका निर्माण झालेला आहे. यासंदर्भात देखील उपाययोजना करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली. या प्रश्नावर देखील जिल्हा पोलीस अधीक्षक घार्गे यांनी तात्काळ कारवाई करण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

यावेळी चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर, नितीन उदमले, सिद्धार्थ सिसोदे, अरुण गाडेकर, जिल्हाध्यक्ष संतोष कानडे, जिल्हा शहराध्यक्ष विनोद कांबळे,रुपेश लोखंडे आदी उपस्थित होते.



चर्मकार विकास संघाच्या वतीने सातत्याने शहरातील अवजड वाहतुकीचा प्रश्न उपस्थित करुन पोलीस प्रशासनाकडे शहरातून अवजड वाहतुक बंद करण्याची मागणी करण्यात आली होती. नव्याने रुजू झालेले जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी या गंभीर प्रश्नाची दखल घेऊन शहरातील अवजड वाहतूक बंद होण्यासाठी उपाययोजना सुरु केल्याने त्यांचा सत्कार संघटनेच्या वतीने करण्यात आला.

शहरात रस्त्याचे कामे सुरु असल्याने पर्यायी मोजके रस्ते वाहतुकीसाठी नागरिकांना वापरावे लागत आहे. तसेच शाळा, महाविद्यालय सुरु झाल्याने त्यामध्ये अवजड वाहने शहरात आल्यास वाहतुक कोंडी व मोठा अपघात होऊन एखाद्याचा जीव जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. यापूर्वी देखील अवजड वाहनांमुळे अनेक अपघात घडले आहे. या गंभीर प्रश्नाची दखल घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक घार्गे यांनी अवजड वाहने शहराच्या बाहेरुन वळविण्याचे उत्तमप्रकारे नियोजन केल्याने काही प्रमाणात हा प्रश्न सुटला असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

# सोनईत एलसीबीचा सुगंधीत माव्यावर छापा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : सोनईजवळ कारखाना परिसरात अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने दहा किलो सुगंधित मावा व मावा तयार करणारी मशिनरी असा एकूण ८०६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना सुगंधी मावा तयार होत असल्याची माहिती मिळाल्याने त्यांनी पथकाला शनिशिंगणापूर ते सोनई रोड लगतचा कारखाना परिसरातील चारी नंबर चार येथे छापा टाकण्यास सांगितले.

पथकाने सदर ठिकाणी दि. ४ जुलै रोजी कारवाई करत २० हजार रुपये किमतीचा सुगंधित मावा, ७५०० हजार रुपये किमतीचा पाच किलो सुगंधित तंबाखू व सुपारीचे मिश्रण, ५० हजार रुपये किमतीचे लोखंडी मशीन, तीन हजार रुपये किमतीचे मावा तयार करण्यासाठी लागणारे मिक्सर व शंभर रुपये किमतीचे प्लास्टिकच्या पिशव्या असा एकूण ८० हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या ठिकाणावरून तय्युब बिबन शेख (रा. पानसवाडी, ता. नेवासा) याला ताब्यात घेतले आहे. जितेंद्र नरेंद्र चांडक उर्फ जितू मालपाणी (रा. मनमाड) हा फरार झाला आहे.

याबाबत स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल विशाल अण्णासाहेब तनपुरे यांनी सोनई पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्याने आरोपीवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२३,२२३,२७४,२७५,३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

सदरची कारवाई ही पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्गे व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली सोमनाथ झांबरे, शिवाजी ढाकणे व अशोक लिपणे यांनी केली आहे.

# ‘त्या’ नराधमांविरुद्ध कठोर कारवाई करा

## पाथर्डीतील मराठा मावळा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : बीड शहरातील नामांकित उमाकिरण संकुल येथे कार्यरत असलेल्या प्रोफेशनल अकादमीतील शिक्षकांनी विद्यार्थिनीशी केलेल्या अमानुष व संतापजनक कृत्यामुळे संपूर्ण समाजात संतापाची लाट उसळली आहे. शिक्षक हा समाज घडवणारा, संस्कार करणारा मानला जातो. मात्र जेव्हा तोच शिक्षक व्यभिचारी आणि दुराचारी निघतो, तेव्हा शिक्षकी पेशाला काळिमा फासणाऱ्या अशा नराधमांविरुद्ध कठोर कारवाई झालीच पाहिजे, अशी संतप्त भावना तालुका मराठा मावळा संघटनेचे अध्यक्ष परमेश्वर टकले यांनी व्यक्त केली आहे.

टकले म्हणाले की, गुरू-शिष्य परंपरेचा आपण अभिमान बाळगतो. भारताला विश्वगुरू म्हणवले जाते. पण अशा शिक्षकांमुळे शिक्षकी पेशाचा अपमान होत असून संपूर्ण समाजाचा या घटनेमुळे तिटकारा वाढला आहे. उमाकिरण संकुलातील प्रशांत खाटोकर व प्रा. विजय पवार यांनी केलेला प्रकार हा अतिशय नीच असून, अशा लोकांना कोणतीही सहानुभूती न देता थेट कारागृहात डांबले पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

निवेदनात म्हटले आहे की, अनेक पालक आपल्या मुला-मुलींच्या उज्वल भविष्यासाठी लाखो रुपये खर्च करून त्यांना शिक्षणासाठी कोचिंग क्लासेसमध्ये पाठवतात. मात्र अशा ठिकाणी जर शिक्षकच भक्षक बनले, तर पालकांनी विश्वास ठेवायचा कुणावर?या नराधम शिक्षकांना भररस्त्यावर नागडं करून ओल्या बांबूने झोडपलं पाहिजे. पोलिसांनीही आरोपींना कसल्याही पळवाटा न देता कठोरात कठोर कारवाई करावी. भविष्यात असे प्रकार पुन्हा घडू नयेत, यासाठी उदाहरण ठरेल अशी शिक्षा झालीच पाहिजे.

# वारी हा वारकरी संप्रदायाचा पाया

## प्राचार्या डॉ. कुंदा कवडे; अळकुटी महाविद्यालयात वारी पंढरीची, ज्ञानगंगा प्रवरेची उपक्रम साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : ज्ञानबा-तुकाराम हा सामाजिक ऐक्याचा संदेश महाराष्ट्राच्या संत परंपरेचा मूलमंत्र आहे. वारी हा वारकरी संप्रदायाचा पाया आहे. पंढरीचा विठुराया व रुक्मिणी माता हे आपले आराध्यदैवत आहे. शेतकरी, कष्टकरी, सर्वच श्रमदाते कुटुंब ही पांडुरंगाची आराधना करतात. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेने या वारी, दिंडी उपक्रमाबरोबर वारी पंढरीची, ज्ञानगंगा प्रवरेची हा उपक्रम राबवत भक्तिमय वातावरणाबरोबर शिक्षणाची सांगड घालत अभिनव उपक्रम राबविला आहे, असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. कुंदा कवडे यांनी केले.

> पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील व पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी प्रवरा शिक्षण संस्थेचा जो वटवृक्ष उभा केला त्यास आषाढी वारीबरोबर एकरूप करण्यात हा उपक्रम अतिशय गौरवास्पद आहे.
>
> **– प्राचार्या डॉ. कुंदा कवडे**

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे अळकुटी महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्यावतीने आषाढी एकादशी व वारी-दिंडीचे औचित्य साधून महाविद्यालय परिसरात पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले.



यāप्रसंगी उपप्राचार्य प्रा. अमोल नालकर, प्रा. अर्जुन चाटे, गोरख घोलप, सूर्यमाला भोर, प्रा. विशाल रोकडे, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. संजय जाधव, प्रा. शर्मिष्ठा बोरुडे, प्रा. सुनिता जाधव, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. विनायक सोनवणे, प्रा. पोपट सुंबरे, डॉ. शांता थोरात, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. संदीप गेटम, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. सुषमा करकंडे, प्रा. सचिन बलसाने, प्रा. सुप्रिया पारखे, प्रा. पांडुरंग उघडे, प्रा. अनुराधा गाढवे, प्रा. पूजा वैरागर, प्रा. ऋषिकेश गिते, प्रा. मच्छिन्द्र बेलोटे, प्रा. राजाराम गोर्डे, सुनीता भालेराव, छाया म्हस्के, विकास सोनवणे, राहुल बोरुडे, सागर शितोळे, मनोहर कनिंगध्वज, मच्छिन्द्र म्हस्कुले, वैजनाथ आवारी, रवींद्र वाघ, पांडुरंग शिरोळे आदी प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

यāप्रसंगी कार्यक्रमाचे नियोजन आयोजन व सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. विशाल रोकडे यांनी केले.

# राहुल पालवेंना गायन-संगीतातील पुरस्कार जाहीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : गायन व संगीत क्षेत्रातील कलावंत राहुल पालवे यांना स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय युवा संगीत अलंकार पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे आषाढी एकादशी व राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त आज, रविवारी होणाऱ्या जगद्गुरु संत तुकाराम महाराज ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात पालवे यांना खा. लंके यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. या कार्यक्रमासाठी विशेष सरकारी वकील अ‍ॅड. सुरेश लगड, साहित्यिक तथा प्राचार्या गुंफाताई कोकाटे, नगर तालुका पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

नेवासा तालुक्यातील माका या ग्रामीण भागातील राहुल पालवे यांनी गायन व संगीत क्षेत्रात आपले नावलौकिक मिळवले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचे गायनाचे कार्यक्रम होत असतात. आपल्या कलाशैलीने त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे.




हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ✲ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11